# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०१५ / फाल्गुन २१, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रिडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९९**

---

**राज्यातील अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत**

**(१) * ३३९४ श्री.कपिल पाटील, डॉ.अपूर्व हिरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित विद्यालयांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या कर्मचारी सुचीवरुन कोणताही शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरविण्यांत येवू नये, असे आदेश मा.न्यायालयाने दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाचे आदेशाबरहुकूम एकही कर्मचारी अतिरिक्त ठरवू नये आणि त्याप्रमाणे स्थगिती दिल्याचा सुधारित शासन निर्णय निर्गमित करावा, म्हणून लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन देवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाकडील दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ चे शासन परिपत्रकान्वये एकाही अतिरिक्त कर्मचाऱ्याचे ऑफ लाईन पध्दतीचे वेतन काढू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यांत आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशाबरहुकुम एकही कर्मचारी अतिरिक्त होणार नाही, असे मा.शिक्षण मंत्री यांनी मान्य केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याउपरही विविध जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ चे वेतन देयके सन २०१३-१४ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वगळून नंतरच सादर करणेचे आदेश दिलेले आहेत व त्याबरोबर मा.मुख्याध्यापक यांचेकडून त्यांनी एकही अतिरिक्त कर्मचाऱ्याचे वेतन काढलेले नाही, याबाबतचे हमीपत्रही घेण्यात आले हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मा.न्यायालयाचे आदेश व मा.मंत्री शालेय शिक्षण विभाग यांचे आदेशाची यातून अवमानना घडून येते, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, शिक्षण सेवकांच्या सेवेस संरक्षण देणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सन २०१३-१४ च्या संचमान्यता व समायोजनाच्या कार्यवाहीस मा.उच्च न्यायालयाने 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

(२) होय.

(३) दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ च्या शासन परिपत्रकान्वये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन ऑनलाईन न काढता ऑफलाईन काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) अतिरिक्त ठरणा-या शिक्षण सेवकांच्या सेवेस संरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## शासनमान्य अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना वैद्यकिय प्रमाणपत्र घेण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सकांना ३ टक्के शुल्क द्यावे लागत असल्याबाबत

**(२) * ३२४३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अनुदानित संस्थामधील शिक्षक-शिक्षकेतरांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती योजना शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि. १२ मे १९८९ अन्वये लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी झालेल्या व होणाऱ्या सुधारणांसह ही योजना शिक्षक-शिक्षकेतरांनाही लागू आहे काय,

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकिय शिक्षण विभागाने १० जूलै, २००१ च्या आदेशान्वये शासकीय कर्मचाऱ्यांना प्रतिपूर्तीसाठी ३ टक्के रक्कम जिल्हा शल्यचिकित्सक यांना देण्याच्या अटीतून वगळयात आले आहे काय,
(४) असल्यास, सदरची तरतुद शिक्षक- शिक्षकेतरांना लागू न करण्याची कारणे काय आहेत,
(५) याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी १२ जानेवारी, २०१५ व १५ जानेवारी, २०१५ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय.
(३), (४), (५) व (६) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १० जुलै, २००१ च्या शासन निर्णयामध्ये परिशिष्ट अ क्र.१ मध्ये वैद्यकीय देयकाच्या प्रतिपूर्तीसाठी ३ टक्के रक्कम शुल्क दर म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक वैद्यकीय अधीक्षक यांना देण्याच्या अटीतून शासकीय कर्मचा-यांना वगळण्यात आले आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी १२ जानेवारी व १५ जानेवारी, २०१५ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुर झालेल्या पाणी पुरवठा योजनेत झालेला अपहार

**(३) * ४१२५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुर झालेल्या ५ गावांच्या पाणी पुरवठा योजनेत उक्त गावातील समित्यांनी आतापर्यंत १ कोटी १६ लाख ७९ हजार ३३४ रुपये निधी घेउनही लोकप्रतिनिधी व समितीच्या अकार्यक्षमतेमुळे सदरील कामे प्रलंबित असून योजना रद्द करण्याचे शासनाच्या विचाराधिन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त योजनेत सदरील गावांच्या समित्यांनी आतापर्यंत सुमारे ४६ लाख १७ हजार ८३५ रुपयांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग एक व दोन प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त गावांच्या पाणी पुरवठा योजना त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच उक्त योजनेतील अपहाराप्रकरणी संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ च्या वार्षिक कृती आराखडयातील समाविष्ट ३ गावांमधील पाणी पुरवठा योजनांबाबतीत संबंधित ग्रामपंचायतींकडून प्रशासकीय बाबींसंबधित पुर्तता होत नसून योजनेसाठी संबंधित गांवाकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सदर गावे आराखडयातून वगळण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच एका गावातील पाणी पुरवठा योजनेच्या कामात रु.६ लाखाचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेल्या एका गावातील पाणी पुरवठा योजनेच्या कामात रु.६ लाखाचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्ष व सचिव यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत राज्यातील पिवळया व केशरी शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य देण्याबाबत

**(४) * २६५४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः मुंबई येथील कांदिवली, चारकोप, ठाणे, पुणे तसेच नाशिक व इतर जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.) आणि शिधापत्रिकाधारकांना अन्न सुरक्षा योजनेमार्फत दरमहा स्वस्त धान्य दुकानामार्फत सवलतीच्या दरात गहू, तांदूळ वितरीत केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत लाभार्थी असलेल्या राज्यातील १ कोटी ७० लाख कुटूंबांना माहे नोव्हेंबर, २०१४ पासून गहू, तांदूळ दिले जात नाही तसेच सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गतच्या रॉकेल कोटयातही शासनाने कपात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) त्यामुळे गोरगरीबांना स्वस्त किंमतीत मिळणारे धान्य त्यांना देण्यात आले नसल्यामुळे तसेच त्यांना बाजारभावाने गहू विकत घेणे आर्थिकदृष्टया परवडत नसल्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाभार्थ्यांना पूर्ववत सवलतीच्या दरात धान्य देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.) आणि केशरी रंगाच्या (ए.पी.एल.) शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य दुकानातून सर्व प्रकारचे धान्य व रॉकेलचा पुरवठा त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच धान्य उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करणाऱ्या दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय,

(२) होय,

(३) नाही,

(४) होय,

(५) व (६) दारिद्रय रेषेखालील लाभार्थी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आले असून त्यांना सवलतीच्या दराने धान्य पुरवठा करण्यात येता राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल (केशरी) शिधापत्रिका धारकांना राज्यशासनाने आर्थिक भार सोसून अन्नधान्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्यास मिळणाऱ्या केरोसिनच्या नियतनामध्ये माहे डिसेंबर, २०१४ मध्ये देण्यात आलेल्या केरोसिन नियतनाच्या सुमारे १८ टक्के कपात केली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत राज्याच्या केरोसिनच्या मागणीच्या २८ टक्के इतके केरोसिनचे नियतन केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होत आहे. सदर उपलब्धतेच्या प्रमाणानुसार केरोसिनचे जिल्हानिहाय नियतन व वितरण करण्यात येते. राज्याच्या केरोसिन कोटयात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतन, ग्रेड पे मध्ये असलली तफावत**

**(५) * २६९० श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतन, ग्रेड पे मध्ये तफावत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी यांचे कामाचे स्वरुप समतुल्य पद, पदनाम सारखे असताना ग्रेड पे मध्ये तफावत असण्याची कारणे काय आहेत,

(३) सदर तफावत दूर करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) संबंधित विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या, कार्यक्षेत्र, संरचनेनुसार असणारी व्याप्ती, पदनिहाय कर्तव्ये व जबाबदाऱ्या याचा साकल्याने विचार करुन वेतनश्रेणी निश्चितीबाबतचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे विविध विद्यापीठातील पदनाम जरी समान असले तरी शैक्षणिक अर्हता व कर्तव्यामध्ये तफावत आहे. त्यामुळे वेतनश्रेण्या व ग्रेड वेतन यामध्ये अंशत: तफावत दिसून येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार व डहाणू तालुक्यामध्ये (जि.पालघर) शिधापत्रिका वितरणात मोठया प्रमाणात होत असलेला गैरव्यवहार**

**(६) * ४०८५ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार व डहाणू या तालुक्यामध्ये आदिवासींना शिधावाटप यंत्रणेमार्फत होणाऱ्या धान्य पुरवठ्याचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रॉकेलच्या कोट्यात ७२ हजार लिटर्सची कपात केल्यामुळे दारिद्र्यरेषेखालील आदिवासींना तसेच गोरगरीबांना रॉकेलसाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदअनुषंगाने दारिद्र्यरेषेखालील आदिवासींना रॉकेलचा पुरवठा तात्काळ वाढवून देण्याबाबत तसेच शिधावाटपाचा काळाबाजार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये डहाणू तालुक्यात धान्याचा काळाबाजाराबाबत व्यक्तींविरुध्द जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अंतर्गत दि. ३.११.२०१४ रोजी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याबाबत पोलीस तपास सुरु आहे.

(२) व (३) केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्यास मिळणाऱ्या केरोसिनच्या नियतनामध्ये माहे डिसेंबर, २०१४ मध्ये देण्यात आलेल्या केरोसिन नियतनाच्या सुमारे १८ टक्के कपात केली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत राज्याच्या केरोसिनच्या मागणीच्या २८ टक्के इतके केरोसिनचे नियतन केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होत आहे. सदर उपलब्धतेच्या प्रमाणानुसार केरोसिनचे जिल्हानिहाय नियतन व वितरण करण्यात येते. राज्याच्या केरोसिन कोटयात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षणाधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७) * ३६८१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असताना ५४ शिक्षणाधिकाऱ्यांची कमतरता असल्याने दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांना शिक्षणाधिकाऱ्यांची कामे करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊ नये म्हणून शिक्षणाधिकाऱ्यांची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) शिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गात सद्य:स्थितीत ५४ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून प्रशासकीय कामकाज पूर्ण करण्यात येत आहे.

(३) व (४) उर्वरित रिक्त पदे पदोन्नतीने, मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे तसेच सरळसेवेने तातडीने भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथील अध्यापकांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत**

**(८) * ३४५८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथील अध्यापकांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठातील अध्यापकांच्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेचे कुलगुरु यांनी दिनांक ८/१/२०१५ रोजी शासनास पत्र दिले आहे.

(३) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेसह राज्यातील शासकिय व अशासकिय अनुदानीत अभियांत्रिकी व इतर पदवी महाविद्यालयातील/संस्थातील अध्यापकांना ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीपैकी २० टक्के राज्य शासन व ८० टक्के थकबाकी केंद्र शासनाकडून देणे अपेक्षित आहे. या पैकी राज्य शासनाने २० टक्के थकबाकीची रक्कम अदा केली आहे. केंद्र शासनाकडील ८० टक्के थकबाकीची रक्कम अदा करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील अनेक गावे व वाडयांमध्ये निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर करावयाची उपाययोजना**

**(९) * ३८८३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अनेक गावांमध्ये व वाडयांमध्ये पाणी टंचाईची परिस्थिती माहे जानेवारी २०१५ नंतर निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी टंचाईवर उपाययोजना करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदेने याबाबत कोणताच निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) पाणी टंचाईवर मात करण्यासाठी रायगड जिल्हयाच्या सन २०१४-१५ या वर्षातील संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यात नविन विंधण विहिरी घेणे, नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती, तात्पुरती पुरक नळ पाणी पुरवठा योजना, प्रगती पथावरील नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करणे व टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे या उपाययोजनांचा समावेश आहे. रायगड जिल्हयाच्या आराखडयात १५ तालुक्यातील ५८१ गावे व ९९५ वाडया असे एकूण १५७६ गावे/वाडयांच्या आराखडयास जिल्हाधिकारी कार्यालयाने मंजूरी दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील गावांना स्वच्छ, शुध्द व फ्लोराईडविरहित पाणी पुरविण्याबाबत**

**(१०) * ३४३९ श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील ४५४ गावांत फ्लोराईडयुक्त पाणी असून ३७७ लोकांना दातांचा तर ८३ लोकांना हाडाचा फ्लोरोसीस झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शणास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर गावांना स्वच्छ, शुध्द व फ्लोराईडविरहित पाणी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय फ्लोराईड प्रतिबंधक व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत केलेल्या सन २०१३ च्या सर्व्हेक्षणानुसार जिल्ह्यातील १३० गावांमध्ये ३७७ लोकांना दातांचा व ८३ लोकांना हाडाचा फ्लोरोसीस झाल्याचे आढळून आले.

सदर ४५४ गावांपैकी ४२३ गावात पाणी पुरवठा योजनांद्वारे, गावात शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उर्वरीत ३१ गावे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखडयात घेण्यात आली असुन त्याची कामे प्रगतीपथावर आहेत. सदरची कामे प्राधान्याने करणेबाबत जिल्हा परिषद यवतमाळ यांच्याद्वारा पाठपुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला शहर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(११) * २९२८ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ६०२ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेने अकोला शहर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे दिनांक १० जून, २०१२ रोजी हस्तांतरीत करण्याचा ठराव करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ च्या संचालक मंडळाच्या १२७ व्या बैठकीत अकोला शहर पाणीपुरवठा योजना ३० वर्षासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हस्तांतरित करून घेण्यावर एकमत झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी पम्पींग मशिनकरिता ४ कोटी व वितरण योजनेबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त योजनेबाबत शासनाची भूमिका उदासिन असल्यामुळे शहराला अनियमित पाणीपुरवठा होत आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

(२) आयुक्त, अकोला महानगरपालिका यांचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्ताव नगरोत्थान महाअभियानांतर्गत विचाराधीन आहे.

(३) नाही. सद्य:स्थितीत अस्तित्वातील पाईपलाईनव्दारे अकोला महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो.

(४) व (५) अकोला शहर पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याची बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये निर्णयार्थ ठेवण्यात आली होती. त्यावर संचालक मंडळाने सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक हिताची नसल्याने योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देखभाल दुरुस्तीसाठी ताब्यात घेणे योग्य ठरणार नाही असा निर्णय घेतला आहे.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्हयातील किल्ले सिंधुदुर्गाची तटबंदीची दुरुस्ती करण्याबाबत

**(१२) * ३८२५ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील सिंधुदुर्ग किल्ल्याची तटबंदी जुनी झाल्याने सातत्याने ढासळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तटबंदीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) सिंधुदुर्ग किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येतो. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई यांनी कळविले आहे, त्याप्रमाणे प्रश्नातील नमूद बाब ही खरी नाही. सद्यस्थितीत तटबंदीचे व इतर किल्ल्यातील वास्तुंच्या जतन व दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय शिक्षण उच्च माध्यमिक शिक्षकाप्रमाणे एससीव्हीसीच्या शिक्षक व निदेशकांची विनाअनुदानकाळातील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबत

**(१३) * ३७७४ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या सेवाशर्ती या तंत्रशिक्षण विभागातील एमसीव्हीसीच्या शिक्षक निदेशकांना लागू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शिक्षण उच्च माध्यमिक शिक्षकांप्रमाणे एससीव्हीसीच्या शिक्षक व निदेशकांची विनाअनुदानकाळातील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
शालेय शिक्षण विभागाने लागू केलेल्या सेवाशर्ती या विभागास लागू होत नाही.
(२) होय.
(३) व (४) शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**मौजे सुटाळा खु.(ता.खामगांव) येथील पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१४) * ४०३८ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुटाळा खु. (ता.खामगांव) येथील भारत निर्माण कार्यक्रम पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत व योजना बंद असल्याबाबत विधान परिषद सदस्यांनी विधान परिषद सभागृहास नियम ९३ अन्वये सूचना उपस्थित केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना पुर्ण न होताच ग्रामपंचायत सुटाळा खु.यांना ताब्यात घेण्याबाबत लेखी स्वरुपात गटविकास अधिकारी खामगांव यांनी कळविले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेच्या नळामधून पाणी येत नसतानासुध्दा ग्रामपंचायतीला सदर नळयोजना ताब्यात घेण्यासाठी लेखी आदेश देणाऱ्या व सदर योजनेच्या भ्रष्टाचारामध्ये संगनमत करणाऱ्या गटविकास अधिकारी खामगांव यांच्यावर शासन कारवाई करणार काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) व (३) नाही.
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खामगांव यांनी त्यांच्या दि. १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये मौजे सुटाळा खु.ता.खामगांव येथील शुक्ला ले आऊट व तायडी कॉलनी येथील नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याच्या व अन्य अटीवर सदर योजना ताब्यात घेण्याबाबत सरपंच/सचिव ग्रामपंचायत सुटाळा खु.यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ५२ हजार २३२ रेशन दुकानांवर बायोमेट्रिक पध्दतीने धान्य देण्याबाबत**

**(१५) * ३०४५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५२ हजार २३२ रेशन दुकानांवर बायोमेट्रिक पध्दतीने धान्य देण्याची योजना अंमलात आणण्याचे विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या विचाराधीन असलेल्या उक्त प्रश्नाबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) शासनाच्या मान्यतेची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र प्राचार्य, कार्यालयीन कर्मचारी व व्यवस्थापन मंजुर करणेबाबत**

**(१६) * २८२६ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९७६ पासुन कनिष्ठ महाविद्यालय अस्तित्वात येवूनही व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाची मागणी असूनही अद्याप कनिष्ठ महाविद्यालयाचे व्यवस्थापन स्वतंत्र करण्यांत आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डी. टी. एड. शेतकी शाळा, आय.टी.आय. या दोन वर्षाच्या कालावधीचा अभ्यासक्रम / कोर्सला व फक्त दोन - दोन वर्ग असलेल्या अन्य विभागास स्वतंत्र प्राचार्य व इतर कर्मचारी यांस शासन मान्यता देत असल्याने, कनिष्ठ महाविद्यालयांना स्वतंत्र प्रशासन न देण्याची कारणे काय आहेत,

(३) प्रश्नोक्त मागणीबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) कनिष्ठ महाविद्यालय स्वतंत्र प्रशासनबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**औरंगाबाद येथील नॅशनल लॉ स्कूलमध्ये कुलगुरुंची नियुक्ती करण्याबाबत**

**(१७) * ३९२४ श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे सुरु होणाऱ्या नॅशनल लॉ स्कूलमध्ये कुलगुरुंची नियुक्ती प्रक्रिया तात्काळ सुरु करणेबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे डिसेंबर, २०१४ मध्ये आदेश दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून, २०१५ पासून नॅशनल लॉ स्कूल औरंगाबाद येथे सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चाकण (जि.पुणे) येथील शाळांमध्ये मुली व महिलांवरील होणारे अत्याचारासंदर्भात देण्यात आलेल्या तक्रार पेटया धूळ खात पडून असल्याबाबत**

**(१८) * २८४७ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुली व महिलांवरील होणारे अत्याचार रोखण्यासाठी चाकण (जि.पुणे) पोलीस स्टेशन महिला दक्षता समितीच्या वतीने प्राथमिक व माध्यमिक शाळा, तसेच महाविद्यालयात लावण्यासाठी देण्यात आलेल्या तक्रार पेटया कांही शाळांमध्ये एक वर्षानंतरही धूळ खात पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार पोलिस अधिक्षकांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या शाळा व्यवस्थापनाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डिकसळ (कर्जत) येथील अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, तंत्रनिकेतन, महाविद्यालयाची आर्थिक चौकशी करण्याबाबत

**(१९) * ३७८३ श्री.विजय गिरकर, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत येथील तासगांवकर अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, तंत्रनिकेतन, या महाविद्यालयांकडे पैसे नसल्याने शैक्षणिक व आर्थिक नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) उक्त महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहा महिन्यांचे वेतन थकले असल्याने विद्यार्थ्यांचे वर्ग भरले नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पैसे नसल्याने सदर महाविद्यालये बंद करण्याशिवाय पर्याय नसल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीनुसार सदर महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक व वेतनाविना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान त्यांना देण्यात आले आहे काय,

(७) नसल्यास, त्यांना कधीपर्यंत देण्यात येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) अशी मागणी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रलंबित वेतनापैकी एक महिन्याचे वेतन दि.०९.०२.२०१५ रोजी दिले असून उर्वरित वेतन मार्च, २०१५ अखेर पर्यंत देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केले आहे. तसेच दिनांक ०९.०२.२०१५ पासून शैक्षणिक कामकाज सुरु झालेले आहे.

(७) एक महिन्याचा पगार दिनांक ०९.०२.२०१५ रोजी देण्यात आला.

-----------------

## इयत्ता आठवीच्या क्रमिक पुस्तकांच्या छपाईबाबत

**(२०) * ३५२७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इयत्ता आठवीची क्रमिक पुस्तके अद्याप छापण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रमिक पुस्तकांचे छपाईबाबतचे शासनाचे सर्वसाधारण धोरण काय आहे व त्यानुसार इयत्ता आठवीच्या क्रमिक पुस्तकांची अद्याप छपाई न होण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच त्याप्रकरणी जबाबदार कोण आहेत व त्यांचेविरुद्ध काय कारवाई करण्यात आली अथवा येत आहे,
(४) त्याचप्रमाणे त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) गतवर्षी खुल्या बाजारामध्ये झालेल्या पुस्तकांच्या विक्रीमध्ये १० % वाढ व सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत पाठ्यपुस्तकांचा झालेला पुरवठा इ. बाबी विचारात घेऊन पाठ्यपुस्तकांची छपाई करण्यात येते.

सन २०१५-१६ करीता इ. ८ वी करीता आवश्यक पाठ्यपुस्तकांपैकी ८५ % पाठ्यपुस्तकांची छपाई पूर्ण झालेली असून पुस्तकांच्या प्रती बालभारतीच्या भांडारामध्ये उपलब्ध आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केंद्र सरकारच्या "शिक्षित भारत" योजनेअंतर्गत स्वतंत्र शिक्षण आयोगाची स्थापन करण्याबाबत**

**(२१) * ३२९९ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च शिक्षण धोरण ठरवितांना विद्यार्थ्यांच्या सूचनांचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मनातील शिक्षण व्यवस्था, शिक्षणाचा दर्जा, नवे बदल हे व्यक्त करण्यासाठी केंद्र सरकारच्या "शिक्षित भारत" योजनेअंतर्गत स्वतंत्र शिक्षण आयोगाची शिक्षणाची भविष्यातील दिशा ठरविण्यासाठी स्थापना करण्याची गरज असल्याचे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रतिभाशाली उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास त्याचा थोडक्यात तपशिल काय आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) केंद्र शासनाकडून सदर योजनेसंदर्भात सूचना आल्यास योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

-----------------

**बीड जिल्ह्यातील क्रिडा संकुलाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) * ३६५४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सहा तालुक्यांत क्रिडा संकुलाचे काम अद्याप मंजुर करण्यात आले नसून उर्वरित तालुक्यात मंजुर असलेली कामे वर्षानुवर्षे रखडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालयातील रिक्त पदे, प्रमुख अधिकाऱ्यांची अनुपस्थिती यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित राहत असून बऱ्याचदा निधी अखर्चित राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील तालुका क्रिडा संकुलाच्या कामाचा आढावा घेऊन मंजुर कामे तात्काळ सुरु करुन उर्वरित सहा तालुक्यांत नविन क्रीडा संकुल मंजुर करण्यासाठी शासन कोणती उपाय योजना करत आहे,

(४) तालुकास्तरीय क्रिडा संकुलाची मंजुर कामे विहित मुदतीत पूर्ण होत नसल्याबाबत तसेच विकास निधी अखर्चित राहिल्याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) बीड जिल्ह्यातील एकूण ११ तालुक्यांपैकी ८ तालुक्यातील कामांना मंजूरी प्राप्त आहे व परळी, वडवणी, आष्टी, या तीन तालुक्यांमध्ये जागा प्राप्त करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) बीड जिल्ह्यातील ८ तालुका क्रीडा संकुलाकरिता एकूण रु.२.८५ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून यापैकी रु.४३.०० लक्ष निधी खर्च झाला आहे. त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन समितीद्वारे प्राप्त निधीतून तसेच स्थानिक आमदार विकास निधींमधून बीड जिल्ह्यातील काही तालुका क्रीडा संकुलनाच्या कामांकरीता निधी प्राप्त झाला असून त्यामधून कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित प्रगतीपथावरील कामांकरीता आवश्यकतेनुसार निधी खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच परळी, वडवणी, आष्टी, येथील तालुका क्रीडा संकुलाकरीता तालुका क्रिडा संकूल समितीद्वारा स्थानिक स्तरावर जागा पाहणी कार्यवाही सुरु आहे. शिरुर कासार, माजलगांव, केज या तीन तालुक्यामध्ये प्राप्त जागेमध्ये प्रशासकीय कारणास्तव बदल करावा लागल्याने नव्याने जागा शोधण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित प्रगतीपथावरील कामांकरीता आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील कचऱ्याची समस्या सोडविण्याबाबत**

**(२३) * २९८६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे योग्यप्रकारे नियोजन केले जात नसल्याने कोट्यवधी रुपये खर्च करुनही प्रश्न सुटत नसल्याचे मत पर्यावरण संवर्धनासाठी आयोजित केलेल्या परिसंवादात तज्ञांनी मत मांडल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) आणि (३) राज्यातील घनकचरा विल्हेवाट लावण्याचा विषय महत्वाचा असून याबाबत राज्य शासन गंभीर आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे घनकचरा अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

१. घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापनाकरीता दरवर्षी २५% निधीची तरतुद करणेबाबत सर्व महानगरपालिकांना निर्देश देण्यांत आले आहेत. त्यानुसार २६ पैकी १९ महानगरपालिकांनी आर्थिक तरतुद करणेबाबत ठराव पास केलेला आहे.

२. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नगर विकास मंत्रालयाने तयार केलेला कृती आराखडयाची कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करण्याबाबत सर्व नगरपालिका व महानगरपालिका यांना निर्देश देण्यांत आले आहेत.

३. अल्मीत्रा पटेल यांनी दाखल केलेल्या अर्ज क्र. १९९/२०१४ मध्ये मा.राष्ट्रीय हरीद लवाद (मुख्य खंडपीठ) यांनी दि. ०५/०२/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार नगर विकास विभाग, महाराष्ट्र विभाग यांना गुजरात व पंजाबच्या धर्तीवर घनकचरा व्यवस्थापनासाठी infrastrcture तयार करण्यासाठी नोडल एजंन्सी स्थापन करणेबाबत कळविण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाने केंद्रिय सार्वजनिक स्वास्थ व पर्यावरण अभियंता संघटना (CPHEEO) यांच्या सहकार्याने घनकचरा व्यवस्थापनाकरीता मे २०१४ मध्ये मार्गदर्शिक पुस्तीका तयार केलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्राधिकार पत्राची छाननी करण्याकरीता व नागरी संस्थांना मार्गदर्शन करण्याकरीता तज्ञ समिती तयार केली आहे. त्यामध्ये ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हनमेंटचा अधिकारी तसेच निवृत्त उपायुक्त, मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी नगरपालिका व महानगरपालिका यांना कारणे दाखवा नोटीस, प्रस्तावित निर्देश तसेच घनकचरा व्यवस्थापन योग्य रितीने करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याव्यतिरिक्त ठाणे, कोल्हापूर, अहमदनगर, परभणी व लातूर महानगरपालिका तसेच महाबळेश्वर, पांचगणी, इचलकरंजी नगरपालिकांवर न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

-----------------

**सांगली जिल्हयातील शाळांना मोफत पुस्तके व शालेय पोषण आहार देण्याबाबत**

**(२४) * ३७२० श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात अनुदानित, विनाअनुदानित वादात विनाअनुदानित शाळेतील १५ हजार विद्यार्थी शासनाच्या मोफत आणि शालेय पोषण आहार योजनेपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अनुदानित, विनाअनुदानित असा भेदभाव न करता जिल्हयातील सर्वच विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके व शालेय पोषण आहार योजनेचा फायदा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) विना अनुदानित शाळामध्ये या योजना लागू नाहीत.

(२), (३) व (४) सर्व शिक्षा अभियान व शालेय पोषण आहार हया केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येतात. शालेय पोषण आहार योजना व सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठयपुस्तक वाटप योजना शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांसाठी लागू आहेत.

-----------------

**बाटली बंद पाण्यामधील ब्रोमेट क्लोराईड आणि क्लोरेटवर आळा घालण्याबाबत**

**(२५) * ३५१४ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबईमध्ये विविध कंपन्याकडून पुरविण्यात येणाऱ्या बाटली बंद पाण्यामध्ये मानवी जीवनास धोकादायक असलेले ब्रोमेट क्लोराईड आणि क्लोरेट ही रसायने असल्याचे भाभा अणुसंशोधन केंद्राच्या संशोधनातून नुकतेच उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रसायनामुळे मानवाच्या आरोग्यास मोठया प्रमाणात धोका निर्माण असल्याने अशा प्रकारास आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) यासंदर्भात अद्यापही कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईत वाडा कोलम तांदळाची विक्री करणाऱ्या दलालांची चौकशी करण्याबाबत**

**(२६) * ३९५९ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वाडा कोलम तांदळाची विक्री करणाऱ्या दलालांकडून गुजरात, आंध्रप्रदेश या राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यातील तांदळाला डबल पॉलीश लावून तो वाडा कोलमच्या नावाने मुंबईसह बाजारपेठेत विकला जात असून मुंबईत व अन्य शहरांमध्ये मॉलमध्ये वाडा कोलम या नावाने विक्री केली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकारांकडे राज्यातील अन्न व औषधी प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सार्वजनिक वितरण प्रणालीतील धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी द्वारपोच वाहतूक योजनेची तरतूद करण्याबाबत**

**(२७) * ३८५३ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक वितरण प्रणालीतील धान्याचा काळाबाजार रोखत ते धान्य पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचावी यासाठी अन्नसुरक्षा कायदयात द्वारपोच वाहतूक योजनेची तरतूद केली मात्र सदर योजना वर्षभराचा कालावधी लोटून सुध्दा अद्याप कार्यान्वित झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच तातडीने द्वारपोच धान्य योजना व्हावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) गरीबांकरीता ३ रु. किला गहू, रु. २ किला तांदूळ व रु. १ किला ज्वारी युपीए सरकारने सुरु केलेली योजना बंद केली आहे काय,

(६) सदर योजना बंद केली असल्यास, गरीबांवर अन्याय होत नाही काय ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार भारतीय अन्न महामंडळ गोदाम ते शासकीय गोदाम व शासकीय गोदाम ते रास्तभाव दुकानांपर्यंत एकाच वाहतुकदारा मार्फत थेट वाहतूकीची पध्दती राज्यामध्ये राबविण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार अहमदनगर, धुळे,नंदुरबार, बीड व अमरावती या ५ जिल्ह्यांमध्ये ही योजना कार्यान्वीत करण्यात आली असून, अन्य जिल्ह्यात वाहतूकीची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) हे खरे नाही. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना विहीत परिमाणानुसार जिल्हानिहाय नियमित अन्नधान्य पुरवठा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात भूजलात नायट्रेटच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२८) * २९४२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात भूजलात नायट्रेटच्या प्रमाणात वाढ झाली असून पाण्याच्या ५ हजार ९०४ नमुन्याची प्रयोगशाळेत तपासणी केली असता, ३ हजार ५१० नमुन्यात पाणी नायट्रेट बाधित दुषित असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने दुषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये म्हणून शासनाने संबंधित उद्योगावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

तथापी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास भूजल सर्व्हेक्षण विभागाने सादर केलेल्या अहवालानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील नोव्हेंबर २०१३ ते जुलै २०१४ या कालावधीत जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, चंद्रपूर येथे एकूण १२ तालुक्यातील ३३३५ पाणी नमुने तपासण्यात आले होते. त्यापैकी १८३९ पाणी नमुन्यामध्ये नायट्रेटचे प्रमाण भारतीय मानकानुसार ४५ पी.पी.एम.पेक्षा जास्त आढळून आले होते. तसेच भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणेच्या प्रयोगशाळेमार्फत एकूण ४२९३ पाण्याचे नमुने तपासण्यात आले होते. त्यापैकी २५९२ पाण्याच्या नमुण्यामध्ये नायट्रेट ४५ पी.पी.एम.पेक्षा जास्त असलेले आढळून आले. जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेमार्फत १५ जानेवारी, २०१५ पर्यंत ८३०३ पाणी नमुने तपासणीस प्राप्त झाले, त्यापैकी ४१०१ पाणी नमुने तपासण्यात आले असून १६७४ नमुने ४५ पी.पी.एम.पेक्षा नायट्रेट असलेले आढळून आले आहे.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या माहिती नुसार कारखान्यांकडे सांडपाणी प्रक्रिया संयत्रे असून ती कार्यरत असतात व चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योगांद्वारे सांडपाण्यावर प्रक्रिया न करता नदीत किंवा नाल्यात पाणी सोडले जात नाही. सर्वसाधारणपणे उद्योगांच्या सांडपाण्यामध्ये नायट्रेटचे प्रमाण आढळून येत नाही. परंतु नागरी वसाहतींमधून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नद्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे नद्या प्रदूषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मंडळाने महानगरपालिका चंद्रपूर आणि नगर परिषद बल्लारपूर यांना घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयत्रणा त्वरीत लावण्याकरीता निर्देश दिलेले आहेत. महानगरपालिका चंद्रपूरचे २५ आणि ४५ दशलक्ष लीटर प्रती दिवस क्षमतेचे दोन घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारणीचे काम ९५ टक्के पुर्ण झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील बिंदु नामावली रोस्टर नियमबाह्यरित्या वैध ठरविल्याबाबत

**(२९) * २७०३ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात झालेल्या बिंदु नामावली रोस्टर गैरव्यवहारात नियमबाह्य रोस्टरला वैध ठरवून बिंदु पुढे ढकलण्याचे आदेश राज्याचे तत्कालीन उप सचिवांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे आदेश निर्गमित करण्याचे अधिकार तत्कालीन उप सचिवांना नसताना देखील झालेला गोंधळ कायम ठेवून बिंदु नामावली कॅरी फॉरवर्ड करण्याचे त्यांनी आदेश निर्गमित केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोस्टरमध्ये खाडाखोड करणाऱ्यांवर कारवाई न करता बिंदु नामावली कॅरी फॉरवर्ड करण्याचे आदेश देणाऱ्या तत्कालीन उपसचिवांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, न करण्याची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंडवाना विद्यापीठात मराठी भाषा विभाग नसल्याबाबत

**(३०) * ३११० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर आणि गडचिरोली या दोन जिल्ह्यांमधील महाविद्यालये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर या विद्यापीठाच्या कक्षेत येत असूनही गोंडवाना विद्यापीठाकडे मराठी विभाग नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे. हे विद्यापीठ नवीन असून १६ विविध विभाग स्थापन करण्याचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी प्राप्त झालेले आहेत. या विद्यापीठामध्ये मराठी विभागासाठी प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील बाहयरुग्ण तपासणीच्या वाढविलेल्या वेळेसंबंधी पुनर्विचार करण्याबाबत**

**(३१) * २७४७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील बाहयरुग्ण विभागात रुग्ण तपासणीची वेळ पुर्वीपासून सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत होती ती १ तासाने वाढवून सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हया वाढविलेल्या वेळेची बाहेर गावांवरुन येणाऱ्या रुग्णांना माहिती नसल्यामुळे ते पूर्वनिर्धारित वेळेतच येतात व वाढविलेल्या १ तासामध्ये या रुग्णालयातील डॉक्टर रुग्ण नसल्याने वाट पहात बसतात, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच बाहयरुग्ण विभागातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांना पुर्वी १.३० वाजता मिळणारी जेवणाची सुट्टी २.३० मिळते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बाहयरुग्ण विभागाची वेळ वाढविण्याची कारणे कोणती व वेळ वाढवून त्याचा फायदा रुग्णांना मिळत आहे काय,
(५) नसल्यास, याविषयी शासन पुनर्विचार करणार आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
शासन नियमानुसार बाहयरुग्ण विभागाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंतची आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मिरा-भाईदरच्या रेशनिंग कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३२) * ३०१५ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मिरा-भाईदरंच्या रेशनिंग कार्यालयासाठी मंजूर कर्मचारी पदे ४३ पदांपैकी फक्त २० कर्मचारी काम करीत असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) मिरा-भाईंदरच्या रेशनिंग कार्यालयामध्ये मंजूर ४३ पदांपैकी २० कर्मचारी कार्यरत आहेत ही बाब खरी असली तरी शिधापत्रिकेच्या कामाकरिता कार्यालयात उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांमार्फत शिधापत्रिकाधारकांची सर्व कामे करुन देण्यात येत असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होते हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) एकूण रिक्त पदांपैकी पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये नियंत्रक शिधावाटप यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठातील १५ वर्षे हंगामी तत्वावर काम करणा-या कर्मचा-यांना वेतनवाढ, पदोन्नती, भविष्य निर्वाह निधी, भरपगारी रजा असे कोणतेही लाभ न मिळाल्याबाबत**

**(३३) * ३०६२ ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात गेली १५ वर्षे हंगामी तत्वावर काम करणारे सुरक्षारक्षक, शिपाई, लिपीक, माळी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गत वर्षी विद्यापीठाने कमी केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व कर्मचाऱ्यांना वेतनवाढ, पदोन्नती, भविष्य निर्वाह निधी, भरपगारी रजा असे कोणतेही लाभ दिले नसून सहा महिने काम केल्यानंतर एक दिवसाची सुट्टी देऊन पुन्हा त्यांना सेवेत घेतले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना कायम कामावर घेण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कर्मचाऱ्यांना कायम कामावर घेतले नसल्यास त्याची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विभागाने त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा उमेदवारांची त्यांना नियमित आस्थापनेवर सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नाही, असे निदेश दिलेले आहेत.

-----------------

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करणेबाबत**

**(३४) * ३९१३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या वतीने सन २०१३-२०१४ या वर्षात मंजूर करण्यांत आलेल्या ४८ पाणीपुरवठा योजनेला डिसेंबर, २०१४ अखेर सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच जिल्ह्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटावा म्हणून सदर योजना तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

जिल्हा परिषद यवतमाळ यांच्याकडील सन २०१३-१४ मधील मंजुर करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांपैकी ४० योजनांची कामे माहे डिसेंबर, २०१४ अखेरपर्यंत सुरु करण्यात आलेली नाहीत.

(२) सदर नळ योजना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत राबविण्यात येत असुन समिती कडून निवीदा प्रक्रीयेस लागणारा विलंब, जागेचे दानपत्र प्राप्त होण्यास विलंब इत्यादी कारणांमुळे कामे सुरु करता आलेली नाहीत.

(३) मंजुर झालेल्या योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने जिल्हा पदिषद मार्फत पाठपुरवठा सुरु असून ४० पैकी सद्यस्थितीत १० योजनांची कामे सुरु झाली आहेत. उर्वरीत कामे सुरु करण्याबाबत जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या मार्फत पाठपुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भटक्या विमुक्तांसाठी प्रत्येक तालुकानिहाय वेगळ्या शाळा करण्याबाबत**

**(३५) * ३३२५ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना शिक्षणाचा मुलभूत अधिकार मिळाला परंतु भटक्या विमुक्त जमातीतील बरीच मुले शाळा बाह्य असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत भटक्या विमुक्तांसाठी प्रत्येक तालुकानिहाय वेगळ्या शाळा करण्याची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३६) * ३३६१ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेसाठी १ कोटी ७७ लाख ७४ हजार रुपयांचा निधी शासनाकडून मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर, क्रिडा साहित्य खरेदी रखडलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) दिनांक ३१.०१.२०१५ ते १४.०२.२०१५ या कालावधीत केरळ येथे संपन्न झालेल्या ३५ व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेसाठी एकूण रु.१७७.८५ लाख एवढी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि स्पर्धेत सहभागी होणा-या महाराष्ट्र राज्याच्या प्रातिनिधिक संघाच्या सराव शिबीरासाठी व अन्य काही तातडीच्या बाबींवर खर्च करण्यासाठी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनला शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथील सुविधांच्या भाड्यापोटी जमा होणा-या रकमेच्या निधीमधून रु. ८०.०० लाख एवढी रक्कम अग्रिम स्वरुपात उपलब्ध करुन देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

-----------------

**महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने शिक्षक पात्रता परिक्षेत डीईटी ऊर्दु माध्यमाच्या विद्याथ्यांला चक्क हातानी लिहीलेले पेपर देण्यात आल्याबाबत.**

**(३७) * ३१६८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्यावतीने दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परिषदेत डीईटी ऊर्दु माध्यमाच्या विद्याथ्यांला चक्क हातानी लिहीलेले पेपर देण्यात आल्यामुळे प्रश्न वाचण्यातच वेळ गेल्याने निकालावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे त्यांच्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना योग्य न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) सन २०१४-१५ च्या शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये उर्दु माध्यमाच्या प्रश्नपत्रिकांच्या छपाईतील चुका टाळण्यासाठी तज्ञांचे अभिप्राय घेऊन हस्तलिखित प्रश्नपत्रिका छापण्यात आल्या होत्या. प्रश्नपत्रिकांची छपाई सुवाच्च व वाचनीय असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गव्हर्नमेंट हायस्कूल (यवतमाळ) शाळेची झालेली दुरवस्था**

**(३८) * ३२३० श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील शैक्षणिक अधिष्ठान असलेल्या गव्हर्नमेंट हायस्कूलच्या विकासासाठी आलेला ७४ लाख रूपयांचा निधी अधिकाऱ्यांनी खर्च केला नसल्यामुळे परत गेल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निधी मिळूनही शिक्षण बांधकाम अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शाळेची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेची दुरवस्था दूर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्याबबात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे काय,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

जि.प. माध्यमिक शाळा, यवतमाळ या शाळेच्या दुरुस्तीकरिता सन २०१२-१३ मध्ये ५.०० लक्ष व सन २०१३-१४ मध्ये रु.३५.०० लक्ष इतका निधी, कार्यकारी अभियंता, जि.प., बांधकाम यांना उपलब्ध करुन दिले होते. सदर निधी अखर्चित राहिला आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

शाळा दुरुस्तीची आवश्यकता आहे. ई-निविदेला अल्प प्रमाणात प्रतिसाद मिळाल्यामुळे व त्या दम्यान लोकसभा निवडणूकीमुळे आचारसंहिता लागल्यामुळे बांधकाम विभागाकडून प्रत्यक्ष कामे सुरु झाली नाहीत. अखर्चित निधी २०१४-१५ मध्ये खर्च करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाथरी (जिल्हा परभणी) येथील स्वस्त धान्य दुकानदारांनी केलेला गैरव्यवहार**

**(३९) * २७९० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील स्वस्त धान्य दुकानदारांनी काळा बाजार व अडवणूक केल्यावरुन नागरीकांनी केलेल्या तक्रारीवरुन परभणी-हिंगोली येथील लोकप्रतिनिधींनी सन २०१४-१५ मध्ये मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी रेशन दुकानदार व पुरवठा विभागातील अधिकारी यांच्या कारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, दोषी दुकानदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, त्यांना पाठीशी घालण्याचे धोरण वरिष्ठ स्तरावरुन राबविण्यात येत आहे काय?

**श्री. गिरीश बापट :** (१) अशा प्रकारची तक्रार श्री.दुर्राणी अब्दुलखान लतीफखान मा. विधान परिषद सदस्य यांनी दि.२२ डिसेंबर, २०१४ च्या पत्रान्वये केली आहे.

(२) व (३) तक्रारीनुसार संबंधित केरोसिन परवानाधारकांची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी परभणी यांनी तहसिलदार पाथरी यांना दि.२० फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**निरक्षकांना साक्षर करण्याचे काम करणाऱ्या साक्षर प्रेरक तीन वर्षे मानधनापासून वंचित असल्याबाबत**

**(४०) * ४३८२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात निरक्षरांना साक्षर करण्याचे काम करणाऱ्या साक्षर प्रेरक व प्ररिका तीन वर्षापासून मानधनापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील निरक्षरता हटविण्यासाठी केंद्र सरकारच्यावतीने साक्षर भारत अभियान सन २०१२ रोजी सुरु करण्यात आले असुन कामधंदा करुन येणाऱ्या गावकऱ्यांसाठी रात्रीची शाळा घेतली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रेरक व प्रेरिकांना मागील तीन वर्षापासून मानधन देण्यात आले नसल्याने त्याची आर्थिक कुंचबणा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व चौकशीच्या अनुषंगाने प्रेरक आणि प्रेरिका यांना त्वरीत मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) साक्षर भारत ही योजना केंद्रात सन २००९-१० पासून व महाराष्ट्रात सन २०१२ पासून सुरू आहे.

(३) अंशतः खरे आहे.

(४) माहे नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्याचे मानधन जिल्हयांना वर्ग करण्यात आले असून साक्षर भारत ही योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाचा हिस्सा निधी रु.३३.७५ कोटी व राज्याचा हिस्सा निधी रु.११.२५ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातून वाहनाच्या नद्या व नाले यामध्ये औद्योगिक कंपन्या विनाप्रक्रिया पाणी सोडण्यात येत असल्यामुळे होत असलेले प्रदुषण**

**(४१) * ४५०५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातून वाहनाच्या नद्या व नाले यामध्ये औद्योगिक कंपन्या विनाप्रक्रिया पाणी सोडण्यात येत असल्यामुळे प्रदूषित पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण वाढत आहे व त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नद्या-नाल्यात विनाप्रक्रिया पाणी सोडणा-या कंपन्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील माध्यमिक शाळांच्या फेरतपासणीबाबत**

**(४२) * ४५४०  श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची तपासणी करतेवेळी आयुक्त (शालेय शिक्षण) यांचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१४ चे पत्रानुसार त्रयस्थ समिती प्रमुख म्हणून शिक्षण उपसंचालक, नाशिक यांची नियुक्ती केली होती व समिती सदस्य म्हणून जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील अधिका-यांचा सदस्य म्हणून समितीमध्ये समावेश केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तपासणी करतेवेळी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील नियुक्त सदस्य अनुपस्थित होते हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अपूर्ण त्रयस्थ समितीने दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ व दिनांक १६ जुलै, २०१३ च्या शासन निर्णय निकषानुसार माध्यमिक शाळांमधील सरासरी हजेरी, परिक्षेचा निकाल तसेच इतर बाबी यामध्ये योग्य पध्दतीने गुणदान केलेले नसल्याने अनेक शाळा अपात्र ठरल्या आहेत हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील शाळांची पुनर्तपासणी करुन त्यांना फेरगुणदाराने अनुदानास पात्र घोषित केले जाणार आहे काय,
(५) याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, त्रयस्थ समितीने सोलापूर जिल्ह्यातील तपासणी केलेल्या ३५ माध्यमिक शाळांपैकी ९ शाळा अनुदानासाठी पात्र ठरविल्या आहेत. तर २६ शाळा अनुदान पात्रतेच्या निकषानुसार विविध कारणास्तव अपात्र ठरविल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील २ हजार ३७२ गावांचा बृहत आराखडा तयार करण्याबाबत**

**(४३) * ४५५६  श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोफत आणि सक्तीच्या शिक्षण अधिकारा नुसार प्राथमिक शाळा १ किमी अंतरावर, उच्च माध्यमिक शाळा ३ किमी तर माध्यमिक शाळा ५ किमी अंतरावर असावीत, शाळा गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी अनेक उत्तम नियमाचा आंतरभाव शिक्षण हक्क कायदा २००९ मध्ये करण्यात आला असून मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी ही यामागील तळमळ आहे त्यानुषंगाने सरकारने २०० लोकसंख्येमागे १ प्राथमिक शाळा तर २ हजार लोकसंख्येसाठी १ माध्यमिक शाळा असा निकर्ष निश्चित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २ हजार ३७२ गावांचा बृहत आराखडा माहे जुलै, २०१२ ला तयार करण्यात आला असून याठिकाणी शाळेच्या इमारतींची आणि शिक्षणाची सोय करण्याचाही निर्णय झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील २ वर्षात राज्यामध्ये २ हजार ३७२ गावात शाळा अद्यापही नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही. मात्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील अटीची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

(३) हे खरे नाही. ५५६ ठिकाणी शाळा सुरु झाल्या आहेत.

(४) व (५) बृहत आराखड्याबाबत न्यायालयीन प्रकरण सुरु आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षण हक्क कायद्याने बंदी घालूनही दक्षिण मुंबईतील विविध शाळांनी प्रवेश प्रक्रियेत केलेला गैरव्यवहार**

**(४४) * ४६७३ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्याने बंदी घालूनही राज्यात विशेषत: मुंबईतील विविध शाळांमध्ये विशेष करुन सीबीएसई, आयसीएसई, आयबी शाळा प्रवेशांच्या वेळी लहान मुलांच्या व त्यांच्या पालकांना मुलाखतीच्या नावाखाली विविध प्रश्न विचारणे, अर्जाकरीता अव्वाच्या सव्वा रक्कम आकारणे, डोनेशन देणाऱ्या पालकांनाच प्रवेशाकरीता प्राधान्य देणे, इत्यादीबाबतच्या तक्रारी पालकांनी राज्य शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सीबीएसई, आयसीएसई या केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या अनेक शाळा राज्य सरकारचे नियम आपल्याला लागू नसल्याचे कारण पुढे करीत जादा शुल्कवसुली, नियम धुडकावून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती, विद्यार्थ्यांचे प्रवेश अशा अनेक बाबतीत मनमानी करीत असल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांची मुलाखत घेणाऱ्या शाळांना २० ते २५ लाख रुपयांपर्यंत दंड करण्याचे अधिकार शिक्षण हक्क कायद्याने राज्य शासनाला दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हे अधिकार असूनही शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ज्या शाळांनी उल्लंघन केले आहे त्यांच्यावर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नाही. तथापि, अधिनियमातील तरतूदीनुसार प्रवेश प्रक्रियेत स्वैरप्रक्रिया न अवलंबिता चाळणी प्रक्रियेचा अवलंब केल्यास पहिल्या उल्लंघनासाठी रु. २५०००/- व त्यानंतरच्या प्रत्येक उल्लंघनासाठी रु. ५००००/- इतक्या द्रव्यदंडास शाळा / व्यक्ती पात्र राहील. तसेच प्रवेशासाठी देणगी / शुल्क घेतल्यास, घेतलेल्या रकमेच्या १० पट वसूलीस पात्र राहील.
(४) व (५) नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

-----------------

**लोटे (रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण करणा-या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४५) * ४७४९ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे (जि.रत्नागिरी) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील तब्बल ९४ कारखाने प्रदूषणकारी असल्याचा अहवाल प्रदुषणमंडळाने माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाला तसेच जिल्हा परिषद रत्नागिरी यांना दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालात अनुषंगाने शासनाने किती प्रदुषणकारी कारखान्यांवर कारवाई केली आहे,
(३) असल्यास, कारवाईचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) जानेवारी, २०१५ मध्ये लोटे औद्योगिक वसाहतीतील लाल संवर्गातील ९४ कारखान्यांची यादी तालुका आरोग्य अधिकारी, खेड यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत देण्यात आली आहे.
(२) आणि (३) जानेवारी, २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीत लोटे औद्योगिक वसाहतीतील ०२ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश, १८ उद्योगांना अंतरिम निर्देश, १२ उद्योगांना प्रस्तावित निर्देश, ०३ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस आणि २१ उद्योगांना समजपत्र अशा एकूण ५६ उद्योगांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्यांत आली आहे.

-----------------

**पुणे (डेक्कन) येथे होममेड चॉकलेट्समध्ये अळया मिळाल्याबाबत**

**(४६) * ५०७१ श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डेक्कन (पुणे) येथे होममेड चॉकलेट्समध्ये अळया मिळाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार गुणवत्ताहिन खाण्यास अयोग्य होममेड चॉकलेट्स बनविणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप काणेतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन, पुणे कार्यालयाने चौकशी केली आहे.

(३) तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. मात्र चौकशी दरम्यान आढळलेल्या त्रुटीबाबत कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षकांना संगणक अर्हता परिक्षा (एमएससीआयटी) उत्तीर्ण करुन प्रमाणपत्रास मुदतवाढ देण्याबाबत**

**(४७) * ५४२७ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांना संगणक अर्हता परिक्षा (एमएससीआयटी) उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यास शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २००७ पर्यंत मुदतवाढ दिली होती, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील काही शिक्षक सन २००७ नंतर सुध्दा संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण झाले व काही शिक्षक अद्यापी संगणक अर्हता परिक्षेला बसले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) शासनाने सन २००७ नंतर संगणक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांची वेतनवाढ रद्द केली असून शिक्षकांकडून ही रक्कम त्यांच्या पगारातून वळती करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) या निर्णयामुळे राज्यातील शिक्षकांत चिंतेचे वातावरण पसरले असून संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करण्यास माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ मिळण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय.

(४) संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करण्यास डिसेंबर, २०१५ पर्यंत मुदतपाढ मिळण्याची मागणी केलेली आहे. हे खरे आहे.

(५) साप्रवि च्या शासन निर्णय क्र.मातस/नस्ती०४/२२४/३९, दि.५.५.२००७ अन्वये महाराष्ट्रातील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांना MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दि. ३१.१२.२००७ पर्यंत मुदत वाढवून देण्यात आली असून सदर मुदतवाए **अंतिम मुदतवाढ** समजण्यात यावी, अशी सूचना आहेत.

-----------------

**शासन सेवेत नियुक्ती केलेल्या व वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या खेळाडूंना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्याबाबत**

**(४८) * ५४७९ श्री.विजय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ८५६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे नाव उज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१० रोजी वा त्यासुमारास शासन सेवेत थेट गट “अ” व “ब” मधील पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या आणि खेळाडूंमधील वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या खेळाडूंना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,

(३) तसेच, शासन निर्णय क्रमांक एलव्हीई १४०४/प्र.क्र.८/सेवा-९, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ मधील मुद्दा क्रमांक ३ मध्ये “अतिप्राविण्य” शब्दामध्ये व्यायामाचे खेळ प्रकारातील (अॅथेलेटिक्स) १, २ व ३ क्रमांक व इतर क्रिडा प्रकारातील फक्त पहिला क्रमांक हा मुद्दा बदलून सर्व प्रकारच्या क्रिडा प्रकारांसाठी पहिल्या तीन क्रमांकासाठी वेतनवाढ देण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती ठोस कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच शासन सेवेत नियुक्ती दिलेल्या खेळाडूंनी नियुक्तीनंतर स्पर्धेमध्ये सहभाग न घेतल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची कोणतीही तरतूद खेळाडूंना शासकीय सेवेमध्ये नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबतच्या प्रचलित धोरणामध्ये अंर्तभूत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यात आलेल्या ज्या खेळाडूंची वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेली आहेत त्या खेळाडूंच्या बाबतीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव या विभागाच्या विचाराधीन आहे.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक २७.०२.२००४ मध्ये सुधारणा करुन सर्वप्रकारच्या क्रिडा प्रकारांमध्ये पहिले तीन क्रमांक मिळविणा-या खेळाडू कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबतची मागणी क्रिडा विभागात प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) खेळाडूंना शासकीय सेवेमध्ये नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबतच्या प्रचलित धोरणामध्ये, शासन सेवेत नियुक्ती दिलेल्या खेळाडूंनी नियुक्तीनंतर स्पर्धेमध्ये सहभाग न घेतल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची तरतदू अंर्तभूत करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे झालेला गैरव्यवहार**

**(४९) * ५४८७ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे शैक्षणिक सत्र, २००८-२००९, २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षात अनिवासी भारतीयांच्या पाल्यांसाठी असलेल्या आरक्षित प्रवेशांमध्ये रिक्त जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांकडून निर्धारित शिक्षण शुल्कापेक्षा अवास्तव जास्तीचे शिक्षण शुल्क घेतल्या गेल्याचे उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनिवासी भारतीयांच्या विद्यार्थ्यांकरिता आरक्षित असलेल्या रिक्त जागांवर यादीतील विद्यार्थ्यांना डावलून इतरांना प्रवेश देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे शैक्षणिक सन २०११-२०१२ मध्ये गुणवत्ता डावलून व्यवस्थापनाच्या नातेवाईकांना प्रवेश देण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे स्नातकोत्तर अभ्यास क्रमासाठी अवैधरित्या ११ विद्यार्थ्यांना प्रवेशित केल्याबद्दल महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक द्वारे ११ लक्ष रुपयांचा या महाविद्यालयावर दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती बाबत अशा अनेक प्रकारच्या तक्रारी होऊन सुध्दा त्यावर कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, संबंधित प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण असलेल्या संबंधित दोषींवर शासन कारवाई करणार काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) होय.

(५) व (६) श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटी व्दारा संचलित डॉ.पंजाबराव देशमुख मेमोरिअल मेडीकल कॉलेज, अमरावती या महाविद्यालयाविरुध्द शासनास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून सदर चौकशी अहवालावरुन उक्त महाविद्यालयाने योग्य कार्यवाही केल्याचे आढळून आले आहे. तसेच, उक्त महाविद्यालयाने सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षी तेथील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेशित करताना पारदर्शकता ठेवली नाही व आरक्षणाचे नियम पाळले नाहीत या तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करण्याकरीता प्रवेश नियंत्रण समितीस कळविण्यात आले आहे.

-----------------

**राज्यातील रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना ७५०० वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(५०) * ३३६७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना १९९६ पासून ७२२५ ची वेतनश्रेणी वाढवून ७५०० करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना त्या प्रमाणात सदर वेतनश्रेणी केवळ परिपत्रकात उल्लेखात नसल्याच्या तांत्रिक कारणावरुन मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विनाअनुदान तत्वावरील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदानास पात्र ठरविण्याबाबत**

**(५१) * ३२५० श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदान तत्वावरील व कायम विनाअनुदान तत्वावरील शिक्षण शास्त्र महाविद्यालयांची क्रमश: संख्या किती आहे,

(२) असल्यास, दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयानुसार यापूर्वीच्या शैक्षणिक संस्था अनुदानास पात्र आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयांना अनुदान देणेबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यात विनाअनुदान तत्वावरील २० व कायम विना अनुदान तत्वावरील ५४१ शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत.

(२) अंशत: खरे आहे. तथापि दिनांक २४.११.२००१ पुर्वी मान्यता दिलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांपैकी विना अनुदानित /कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या ८९ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान देण्यात येत नाही.

(३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत**

**(५२) * २६५६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २५४० ला दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच जिल्हा परिषद शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे वेतन व भत्ते ऑफलाईन पध्दतीने करणेबाबत शासनाने दिनांक१४ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास आदेश काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ऑफलाईन पध्दतीने वेतन देण्यास माहे मार्च, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील अतिरिक्त ९०० शिक्षकांना पदमान्यता नसल्याने त्यांना वेतनापासून वंचित राहावे लागत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिरिक्त ठरलेल्या ९०० शिक्षकांच्या पदांना पदमान्यता देऊन त्यांचे थकित वेतन देण्याबाबत तसेच दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ पुर्वी नविन शाळा सुरु करण्यास झालेल्या विलंबास जबाबदार असणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे,

(२) होय, हे खरे आहे,

(३) होय, हे खरे आहे,

(४) व (५) बृहत आराखडयानुसार बीड जिल्हा परिषदेच्या सुरु झालेल्या २२१ नवीन प्राथमिक शाळा व ३७ उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थी संख्येवर आधारीत ७८४ वाढीव पदमान्यतेच्या प्रस्ताव संचालकाकडून शासनास प्राप्त झाल्यावर अनुषंगिक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे किडनी ट्रान्सप्लांट शस्त्राक्रिया सुरू करण्याबाबत**

**(५३) * २६८१ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रूग्णालय, नागपूर येथे किडनी ट्रान्सप्लांट शस्त्राक्रिया कैंद्र अद्यापपर्यंत सुरू करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच किडनी करिता विशेष वार्ड सुरू केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया केंद्र सुरु करण्याच्या अुनषंगाने किडनी प्रत्योरोपनाकरीता आवश्यक सीव्हीटीएस ओटी व आयसोलेशन रुम तयार करणे, तसेच सदर केंद्रसाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी व पदनिर्मीती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**भुसावळ (जि.जळगांव) येथील संस्था अनधिकृतरित्या शासकीय धान्याची उचल करित असल्याबाबत**

**(५४) * ४०८२ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथे सहकार कायद्याखाली नोंदणी नसतानाही रामदास आठवले मागासवर्गीय ग्राहक संस्था, अफसाना महिला उदयोग उत्पादक संस्था, जनता को-ऑपरेटर कंझ्युमर सोसायटी, जतन महिला औदयोगिक उत्पादन सहकारी संस्था, महालक्ष्मी माता महिला सहकारी औद्योगिक संस्था स्वस्त धान्य दुकान व केरोसिन डेपो सवर्ण व्यक्तीमार्फत चालवून अनधिकृतरित्या शासकीय धान्याची खरेदी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त संचालकांच्या जातीची पडताळणी शासनाद्वारे करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त संस्थांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या संस्था चालकांवर शासनाने काणेती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अ) रामदास आठवले मागासवर्गीय ग्राहक ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानदाराचे व्यवहार नियमानुसार नसल्यामुळे संस्थेचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले होते.

मात्र संस्थेच्या पुर्नर्निरीक्षण अर्जावर उप आयुक्त (पुरवठा), नाशिक यांनी दिलेल्या आदेशानुसार स्वस्तधान्य दुकान चालविण्यात दिलेले आहे.

ब) अफसाना महिला उद्योग सोसायटी ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानदाराचे व्यवहार नियमानुसार नसल्यामुळे संस्थेचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले होते.

तथापि मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे आदेशानुसार सदर स्वस्त धान्य दुकान तात्पुरत्या स्वरुपात स्वस्त धान्य दुकानदाराकडे प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत चालविण्यास ठेवले आहे.

क) जनता को.ऑ.कन्झुमर सोसायटी ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या केरोसिन परवान्याबाबतचे व्यवहार नियमानुसार नसल्यामुळे संस्थेचा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे व केरोसिनचा कोटा इतरत्र जोडण्यात आलेला आहे.

ड) जतन महिला औद्योगिक उत्पादक संस्था ही नोंदणीकृत संस्था असून स्वस्त धान्य दुकान चालविण्यास संस्थेने असमर्थ असल्याचे कळविल्यानुसार दुकान तात्पुरत्या स्वरुपात इतर दुकानदाराकडे चालविण्यास ठेवले आहे.

ई) महालक्ष्मी माता सहकारी औद्योगिक संस्था ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानाची पुरवठा अधिकारी, जळगांव यांनी तपासणी केली असता स्वस्त धान्य दुकानात दोष आढळल्याने संबंधित संस्थेवर गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी दिवाणी न्यायालय भुसावळ यांनी दिलेल्या निकालानुसार सदर परवाना पूर्ववत सुरू करण्यात आला आहे.

(२) बचत गट/सामाजिक संस्थाना स्वस्त धान्य व केरोसिन परवाने मंजूर करताना जातीची पडताळणी करणे गरजेचे नाही.

(३) व (४) उत्तर भाग १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डॉ.राम ताकवले व त्यागराजन समित्यांच्या अहवालाबाबत**

**(५५) * ३४८७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३८४ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांबाबत डॉ.राम ताकवले व त्यागराजन या समित्यांनी शासनास सादर केलेले अहवाल दिनांक ९ मे, २०१२ पासून शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.राम ताकवले समितीने मुंबई, पुणे व नागपूर विद्यापीठांचे विभाजन करुन स्वतंत्र विद्यापीठे स्थापन करण्याबाबत तर त्यागराजन समितीने प्रत्येक विद्यापीठात किमान १०० महाविद्यालयांचा समावेश असावा याबाबत आपल्या अहवालांमध्ये शासनास शिफारशी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमांच्या तरतुदींना अंतिम स्वरुप देवून ३५ नवीन उपविद्यापीठांची निर्मिती करण्यासंदर्भात शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, डॉ.राम ताकवले समितीचा अहवाल प्रलंबित आहे.

(२) डॉ. राम ताकवले समितीने मोठया विद्यापिठांचे विभाजन करण्याची शिफारस केली आहे.

(३) अहवाल विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात शालेय आरोग्य तपासणी करण्याबाबत**

**(५६) * ३४४२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००८ पासून सर्वशिक्षा अभियानातंर्गत शालेय आरोग्य तपासणी केली जाते मात्र मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात सन २०१४-१५ या वर्षाचे शैक्षणिक वर्ष सुरु होऊन सुमारे ७ वर्षाचा कालावधी लोटूनही अद्याप शालेय आरोग्य तपासणी करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. मारेगांव (जि.यवतमाळ) येथील शाळा तपासणीचे काम नियोजित वेळापत्रकानुसार सुरु होते. मारेगाव येथील कार्यरत दोन पथकापैकी एका पथकाची प्रतिनियुक्ती ग्रामीण रुग्णालय करंजी येथे ऑगस्ट, २०१४ पासून करण्यात आली. त्यामुळे शालेय आरोग्य तपासणीचा भार एकाच पथकावर आला. सदर पथकात वैद्यकिय अधिकारी (स्त्री) हे पद रिक्त असल्यामुळे वैद्यकिय अधिकारी (पु) यांच्यावर तपासणीचा भार असल्यामुळे तपासणीच्या कार्यास विलंब झाला. तसेच सप्टेंबर, २०१४ पासून ग्रामीण रुग्णालय मारेगाव येथील पथकास वाहन उपलब्ध नसल्याने तपासणीच्या कार्यात अडथळा निर्माण झाला. तरीही काही शाळा तपासणी दुचाकीवरुन करण्यात आले. १ डिसेंबर, २०१४ पासून शालेय आरोग्य तपासणीसाठी रुग्णवाहीका उपलब्ध करुन दिल्यामुळे तपासणीच्या कामात वेग आला व तपासणी पूर्ण करण्यात आली.

(२) शालेय आरोग्य तपासणी नियोजनानुसार सुरु होती त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला येथील प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेस प्रशासकिय मान्यता देण्याबाबत**

**(५७) * २९१३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत शिवर व ६ गावे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना (ता.अकोला जि.अकोला) या प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे काय,

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत समाविष्ट असलेल्या शिवर ६ गांव प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना, तालुका व जिल्हा अकोला, या योजनेच्या प्रस्तावावर छाननी होऊन पूर्तता अहवाल अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ, अकोला यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मुंबई यांच्याकडे दि.४.१२.२०१४ रोजी सादर केला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

(२) होय.

(३) प्रस्तुत योजनेस प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डेंग्यु साथीला प्रतिबंध करण्यासाठी निकृष्ट प्रतीची औषधे पुरविणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत

**(५८)** * **३८२४ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डेंग्यु साथीला प्रतिबंध करण्यासाठी पुरविण्यात आलेली औषधे निकृष्ट दर्जाची असल्याचे माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात डघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट प्रतीची औषधे पुरविणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे आणि औरंगाबाद येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅट्रॉनिक्स अभ्यासक्रमासाठी शिक्षकांची पदे भरण्याबाबत**

**(५९) * ३७६६ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि औरंगाबाद येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅट्रानिक्स अभ्यासक्रम सुरू करण्यांत आला आहे, मात्र पात्र शिक्षकांची कमतरता असल्याने सन २०१४-२०१५ या वर्षात सदर कोर्ससाठी प्रवेश प्रक्रिया राबविली गेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मेकॅट्रॉनिक्सचा अभ्यासक्रम पूर्ण क्षमतेने चालावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) नाही.

(३) शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद या संस्थेस अध्यापकांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत अंगणवाडीची बक्षिसाची रक्कम प्रलंबित असल्याबाबत**

**(६०) * ४०४५ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राहुड, ता.खामगांव, (जि.बुलडाणा) या अंगणवाडीला ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत सन २०१०-२०११ ला विभागीय स्तरावरील द्वितीय क्रमांकाचे बक्षिस जाहिर होऊन बक्षिसाची रक्कम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बक्षिसाची रक्कम अद्यापपावेतो संबंधीत अंगणवाडी यांना देण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ३ वर्षापासून बक्षिसाची रक्कम न देण्याची कारणे काय,

(४) असल्यास, टाळाटाळ करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) मौजे राहुड, ता.खामगांव जि.बुलढाणा या अंगणवाडीला ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत सन २००९-१० या वर्षातील प्रथम क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले आहे. विभागस्तरावर केवळ प्रथम क्रमाकांचे बक्षीस देय आहे.

(२), (३) व (४) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत शासन निर्णय क्रमांकः अभियान-१००८/प्र.क्र.१७७/पापु-१६, दिनांक १५ सप्टेंबर, २००८ अन्वये विभाग स्तरावर प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक व तृतीय क्रमांकासाठी निवडलेल्या ग्रामपंचायतींना अनुक्रमे रु.१० लाख, रु.८ लाख व रु. ६ लाख तसेच विभाग स्तरावरील स्वच्छ शाळा व अंगणवाडी यांना अनुक्रमे रु.१ लाख व रु.५० हजार या प्रमाणे अभियानांतर्गत विभाग स्तरावरील बक्षीसांसाठी रु.२५ लाख, ५० हजार एवढ्या बक्षीस रकमेचे वितरण करण्यात येते. तथापि, सन २००९-१० मध्ये अमरावती विभाग स्तरावरील बक्षीसांसाठी रु.२४ लाख एवढ्या रकमेचे वितरण करण्यात आलेले आहे. विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग यांनी त्यांच्या दि.२७.२.२०१५ च्या पत्रान्वये उपरोक्त बक्षीस रक्कम अदा करणेबाबत कळविले आहे, यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील अनुदान प्राप्त शाळांची फेरतपासणी रद्द करणेबाबत**

**(६१) * २८२५ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदान पात्र शाळांची फेरतपासणी रद्द व्हावी, या व इतर अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य (कायम) विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या शहर शाखेने नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास धरणे धरण्यांत आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे नाव्हेबर, २०१४ च्या दुसऱ्या सप्ताहात शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १५ नोव्हेंबर, २०११ च्या शासननिर्णयान्वये त्रयस्त समितीबाबत कोणतीही तरतुद नसतांना अनुदान प्राप्त शाळांची अशा समितीकडून फेरतपासणी करण्यांत येत आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, सदरहु फेरतपासणी त्वरीत थांबवून शासनाने अनुदान जाहिर केलेल्या सर्वशाळांना अनुदान देणे व सन २०१४ साली ऑनलाईन पध्दतीने पात्र झालेल्या व अनुदानासाठी शिफारस झालेल्या सर्व शाळांना अनुदान देण्यासंदर्भात शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय, कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या ज्या शाळा, मुल्यांकनाचे शासनाने ठरवून दिलेले निकष पूर्ण करु न शकल्यामुळे जिल्हास्तरावरील मुल्यांकन समितीने अपात्र ठरविल्या होत्या त्या शाळांच्या संस्थाचालकांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या होत्या. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने एकत्रित सुनावणी घेऊन दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी आदेश दिले आहेत. त्यानुसार संबंधित शिक्षण संस्थांची सुनावणी घेऊन त्यांच्या पात्रतेबाबत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) होय, शासन स्तरावरुन शाळांना अनुदानास पात्र घोषित केल्यानंतर देखील सदर आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यापूर्वी पुन्हा संबंधित शाळेची तपासणी करण्यात येईल, असे अनुदान आदेशात स्पष्ट नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्रयस्थ समित्यांमार्फत तपासण्या सुरु आहेत.

-----------------

**राज्य शासन "शिवछत्रपती पुरस्कार" विजेत्यांना थेट नोकरीत सामावून घेण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना**

**(६२) * ३९४३ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन "शिवछत्रपती पुरस्कार" विजेत्यांना थेट नोकरीत सामावून घेण्यासाठी धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे व त्यांचे स्वरुप काय,

(३) उद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांना शासन सेवेत थेट नोकरी देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही. खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतच्या प्रचलित तरतूदीनुसार आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यात येते. सदर तरतूदीनुसार शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त करणारे खेळाडु थेट नियुक्तीसाठी पात्र ठरल्यास त्यांचाही थेट नियुक्तीसाठी विचार केला जातो. तथापि केवळ शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त केल्यामुळे खेळाडू शासन सेवेत थेट नियुक्ती मिळण्यासाठी पात्र ठरत नाहीत.

-----------------

**राज्यातील मराठी, इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत**

**(६३) * २८५४ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लहान मुलांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी व्हावे यासाठी शासनाने दिनांक १७ एप्रिल, २००६ मध्ये राज्यातील सर्व शाळांना स्पष्ट आदेश दिले असतानाही तसेच नागपूर खंडपीठामध्ये वह्यापुस्तकांचे विद्यार्थ्यांवर लादले जाणारे दप्तराचे ओझे हलके करावे यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती, या याचिकेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना व उपाययोजना करताना येणाऱ्या अडचणी याबाबत नेमके उपाय सुचविण्यासाठी शासनाने समिती स्थापन करण्याचे आदेश शिक्षण विभागास दिले असताना विद्यार्थ्यांचे पाठीवरील दप्तराचे ओझे कमी झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलांना वह्यांचे व नव्या नव्या प्रोजेक्टच्या सामुग्रीमुळे ओझे वाढत असल्याने पुण्यातील अस्थिरोतज्ज्ञ डॉ.किरण शेटे यांनी पाठीवरील दप्तराच्या ओझ्याचा थेट परिणाम मुलांच्या पाठीचा मणका आणि सांध्यांवर होत असल्याचे मत व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाच्या आदेशानुसार समिती स्थापन करण्यात आली आहे काय तसेच समितीवर कोणत्या क्षेत्रातील व किती जणांची नियुक्ती करण्यात आली आहे,

(४) असल्यास, नियुक्ती करण्यात आलेल्या समितीने शासनास कोणत्या शिफारशी व सूचना सुचविल्या आहेत,

(५) असल्यास, मुलांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासंदर्भात असलेले शासनाच्या नियमांचे कुठल्याही शाळेकडून पालन होत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्रश्न भाग एक व दोन बाबत शासनाने दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच ज्या शाळा नियमांचे उल्लंघन करतात त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शालेय विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानुषंगाने शासनाने शासन निर्णय २५/११/२०१४ अन्वये विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना याबाबत समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) होय. सदर समितीमध्ये शिक्षण संचालक (प्राथमिक) हे अध्यक्ष असून इतर सदस्यांमध्ये उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, बालमानस शास्त्रातील एक तज्ञ, संस्थाचालक प्रतिनिधी, शाळा मुख्याध्यापक प्रतिनिधी, पालक प्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रात या विषयाशी संबंधित कार्य करणारा एक प्रतिनिधी व शिक्षण उपसंचालक (प्राथमिक) अशा एकूण ८ जणांचा समावेश असून समितीने शासनास अद्याप कोणत्याही शिफारशी व सूचना केलेल्या नाहीत.

(५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील शाळांना संगणक संचाचा पुरवठा करण्याबाबत**

**(६४) * ३७९१ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे २ हजार ७४८ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना १ हजार १०३ संगणक संचाचा पुरवठा करण्यात आलेला आहे मात्र त्यापैकी केवळ ८०० शाळांमध्ये संगणक संच अद्यापपर्यंत सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(३) उर्वरित ३०३ शाळांमध्ये संगणक संच नादुरुस्त बनल्याने धुळखात पडले असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संगणक दुरुस्तीविना पडून ठेवण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) एकूण ११०३ शाळांपैकी ९२७ शाळांत लोकवर्गणी, देणगी इ. मार्फत तर १७६ शाळांत सर्व शिक्षा अभियान योजनेतून संगणक संच देण्यात आले आहेत. लोकवर्गणी / देणगी इ. मार्फत प्राप्त झालेल्या संगणक संचांपैकी २६५ शाळातील तर सर्व शिक्षा अभियान योजनेतून प्राप्त संगणक संचांपैकी ३८ संच नादुरुस्त आहेत.

सदर शाळांमधील नादुरुस्त संगणकांपैकी बहुतांशी संगणक हे सन २००३ पासून पुरवठा केलेले असल्याचे त्याचे स्पेअर पार्टस जुने असल्याने उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे संगणकांची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. सर्व शिक्षा अभियान योजनेतून मिळालेल्या नादुरुस्त संगणकांची दुरुस्ती करुन घेण्याबाबत संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**राज्यातील वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालयासाठी वाढीव कर्मचारीवृंद मंजुर करण्याबाबत**

**(६५) * ३५३२ अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन आदेशानुसार राज्यातील जिल्हा परिषदांच्या शिक्षण विभागाअंतर्गत वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालयासाठी सन १९७२ मध्ये कर्मचारी आकृती बंध निश्चित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९७२ ते सन २०१४ या कालावधीत सर्व जिल्ह्यातील शाळांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन कर्मचारीवृंदाच्या संख्येत मात्र अद्याप वाढ करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा रायगड येथे सन १९७२ मध्ये असलेल्या ५० शाळावरुन सद्य:स्थितीत ३०० शाळा चालविण्यात जात आहेत व त्यासाठी देखील अद्याप ११ कर्मचारी पदे मंजूर असल्याने या शाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भविष्य निर्वाह निधीतील रक्कमा सहा-सहा महिने मिळत नसल्याच्या तक्रारी संबंधितांनी केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे रायगड येथील वेतन पथक कार्यालयात कर्मचारीवृंद वाढवून मिळण्याबाबत तेथील कार्यालय प्रशासनाने जिल्हाधिकारी, रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, रायगड तसेच सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचेकडे गेल्यावर्षापासून आतापावेतो अनेकदा प्रस्ताव पाठवून देखील त्याप्रकरणी अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यामध्ये काय आढळून आले,

(६) त्यानुसार सदर कार्यालयातील कर्मचारी आकृतीबंध वाढविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व नसल्यास, कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयाबाबत तक्रारी आहेत.

(४), (५) व (६) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आयुक्त, शिक्षण, पुणे या कार्यालयात छाननी करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची इमारतीचा पुनर्विकासाबाबत

**(६६) * २९८५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादरच्या डिसिल्व्हा रोडवरील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला लागलेल्या आगीमुळे ग्रंथालय सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून ऐतिहासिक ग्रंथसंपदेचा दुर्मिळ ठेवा असलेले हे ग्रंथसंग्रहालय बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची इमारतीचा पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबई मराठी ग्रंथालय पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न भाग १ बाबत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई यांच्याकडून पाहणी करण्यात आली आहे. सदर ग्रंथालयाने सुरक्षिततेच्यादृष्टीने अग्निशमन यंत्रणा अद्ययावत केली आहे.

प्रश्न भाग २ बाबत प्रश्न उद्भवत नाही.

(४) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला आग लागलेली नसून, तेथील तळमजल्यावरील टायटन शोरुमच्या इलेक्ट्रीक विद्युत फलकामध्ये झालेल्या शॉर्ट सर्कीटमुळे आग लागली होती. त्यामध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अंतर्गत भागाचे व ग्रंथसंपदेचे कोणतेही नुकसान झालेले नाही. हे ग्रंथालय सद्यःस्थितीत सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणावर करावयाची उपाययोजना**

**(६७) * ३९६३ श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदुषण महामंडळाच्या सर्व्हेक्षणानुसार सध्या देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये चंद्रपूर चौथ्या क्रमांकावर असून हवेत २.५ मायक्रोमीटरपेक्षा कमी व्यासाच्या सुक्ष्मकणांचे (पीएम २.५) प्रमाण ७६ असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने ९१ देशातील १६०० शहरांचा अभ्यास करुन केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १३ जानेवारी, २०१० च्या कार्यालयीन आदेशान्वये चंद्रपूर देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये चौथ्या क्रमांकावर होते.

तसेच जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या अभ्यासानुसार चंद्रपूर येथील हवेत २.५ मायक्रोमीटर पेक्षा कमी व्यासाच्या सुक्ष्म कणांचे (पीएम २.५) प्रमाण ७६ असल्याचे नमूद आहे.

(२) व (३) केंद्र शासनाच्या दिनांक १३ जानेवारी, २०१० रोजीच्या कार्यालयीन आदेशाव्दारे उद्योग उभारणीकरीता/उद्योगाचे विस्तारीकरण करण्याकरीता प्रदूषित क्षेत्रात बंदी घालण्यात आलेली आहे. प्रदूषण पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी चंद्रपूर कृती आराखड्यानुसार कार्यवाही करण्यात येत असून सन २०१३ रोजी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या सर्वेक्षणानुसार चंद्रपूर शहराचे 'समग्र पर्यावरण प्रदूषण मुल्य (CEPI)' ८३.८८ वरुन ८१.९० एवढे झालेले असून सद्यःस्थितीत चंद्रपूर चौथ्या क्रमांकावरुन सहाव्या क्रमांकावर आलेले आहे.

याशिवाय चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राकरीता हवेच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन व आराखडा बनविण्याकरीता भारतीय प्रोद्योगिकी संस्थान मुंबई व राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्था यांना कार्यादेश प्रदान केलेला आहे व सदर कार्य अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### चंद्रपूर जिल्हयात प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून नागरीकांना साक्षर करण्याबाबत

**(६८) * २९५४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात शासनाने प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून नागरीकांना साक्षर करण्याच्या दृष्टीकोनातून निरंतर शिक्षण विभाग सुरू करुनही चंद्रपूर जिल्हयात सन २०११ च्या जनगणनेनुसार २५ टक्के ग्रामीण तर १२ टक्के नागरी क्षेत्रातील नागरीक अशिक्षीत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साक्षरतेचे प्रमाण वाढण्याकरीता शासनाने लाखो रुपये खर्च करुनही अधिकाऱ्यांच्या नियोजन शुन्य धोरणामुळे जिल्हा मागे पडल्याचे दिसते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासन ठोस उपाययोजना करणार आहे काय,

(४) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे राज्याची ग्रामीण साक्षरता ७७.०९% व शहरी साक्षरता ८९.८४% असून चंद्रपूर जिल्ह्याची ग्रामीण साक्षरता ७६.७७% व शहरी साक्षरता ८९.७३% आहे. हे पाहता चंद्रपूर जिल्हा राज्याच्या साक्षरतेच्या जवळपास असल्याने जिल्हा मागे पडला आहे, असे म्हणणे उचित होणार नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### मांढळ (जि.नाशिक) येथे जलस्वराज्य प्रकल्पात झालेला भ्रष्ट्राचार

**(६९) * ३१११ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरतील मांढळ येथे जलस्वराज्य प्रकल्पाची कामे पूर्ण झाली असली तरी नागरिकापर्यंत एक थेंबही पाणी पोहोचले नसल्याने जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामात लाखो रूपयांचा भ्रष्ट्राचार झाला असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेने भ्रष्ट्राचारात सामील ओंकार पॉलिर्मस कंपनीविरूध्द कुही पोलिस ठाण्यात तक्रार नोंदीवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

मौ. मांढळ येथील जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनेत वापरण्यात आलेले पाईप्स निकृष्ट दर्जाचे असल्याचे जानेवारी, २०११ मध्ये निदर्शनास आले.

(२) व (३) होय. पाईप उत्पादक कंपनी मे.ओंकार पॉलीमर्स व पाईप्स पुरवठादार मे. मदन एजन्सीज, नागपूर यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, कुही येथे भा.दं.वि.कलम ३४ व ४२० अन्वये दि. ०६/०१/२०१५ रोजी गुन्हा क्र. ३/२०१५ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कला संचालनालयांतर्गत कला महाविद्‌यालयातील अधिव्याख्यात्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी व इतर आर्थिक सोयी सवलती तात्काळ लागू करण्याबाबत**

**(७०) * २७५०  श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४ कला महाविद्‌यालयातील अधिव्याख्यात्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने त्रिस्तरीय वेतनश्रेणी ऐवजी आश्वासित प्रगती योजना चुकीच्या पध्दतीने लागू केली तसेच चुकीने लागू केलेल्या आश्वासित प्रगती योजनेची वसुली करण्याचे आदेश वित्त मंत्रालयाने दिले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महाराष्ट्र राज्य प्रशासनीक न्यायाधिकरण (मॅट) औरंगाबाद खंडपीठ यांनी न्यायालयात दाखल याचिकेवर निर्णय देऊन प्रशासकीय कला महाविद्‌यालयातील अधिव्याख्यात्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची त्रिस्तरीय वेतनश्रेणी व सर्व आर्थिक लाभ १९८६ पासून देण्याबाबतचा निर्णय दिला, हे ही खरे आहे काय,

(४) या निर्णयाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये याचिका क्र. ४९७७/२००४ व ४९७८/२००४ हया याचिका दाखल केल्या असल्याने अंतिम निर्णय प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अधिव्याख्यात्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्याच्या दृष्टीने याचिका मागे घेण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) सदर प्रकरणी शासनाने मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असल्याने सदर याचिका मागे घेण्याबाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील खाजगी प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविण्यात आल्याबाबत**

**(७१) * ३०१६ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील खाजगी प्राथमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या १७० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविण्यात येवून त्यांना मागील तीन महिन्यापासून पासून वेतन देण्यात आले नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना तातडीने वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर शिक्षकांचे वेतन अदा करण्यात आले आहे.

-----------------

**ठाणे जिल्हयाचे विभाजन करून नविन अस्तित्वात आलेल्या पालघर जिल्हयात शिक्षण विभागात रिक्त असलेली पदे**

**(७२) * ३०८७ ॲड.अनिल परब, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयाचे विभाजन करून नविन अस्तित्वात आलेल्या पालघर जिल्हयात ३ हजार शाळांमध्ये शिक्षणाधिकारी यांचे पद वगळता अन्य पदे भरली नसल्याने जिल्हयातील आठ तालुक्यातील १३६ अनुदानित शाळांचे काम बंद असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दि. १७.०१.२०१५ च्या निवेदनान्वये कामकाज बंद असल्याची बाब मा. लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे. परंतू उपलब्ध कर्मचा-यांकडून दैनंदिन कामकाज पार पाडण्यात येत आहे.

(२), (३) व (४) नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील विभागाच्या संबंधित कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत अन्न आयोगाची स्थापना करण्याबाबत**

**(७३) * ४९१२ श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत अन्न आयोगाची स्थापना करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देश दिनांक २ डिसेंबर, २०१४ च्या नुसार आयोगाची स्थापना करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अन्न आयोगाची तातडीने स्थापना करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, तथापि राज्य अन्न आयोगाचे कामकाज पाहण्यासाठी सचिव (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार सदर आयोगाची स्थापना करणे बंधनकारक आहे.

(३) व (४) राज्य अन्न आयोगाच्या स्थापनेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**आर्णी व यवतमाळ तालुक्यात राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये झालेला अपहार**

**(७४) * ३३२६ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी व यवतमाळ (जि.यवतमाळ) तालुक्यात राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये तीन कोटी रुपयांचा अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच काही ठिकाणी काम न करताच परस्पर निधी खर्च केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व अपहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

आर्णि व यवतमाळ तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या कामाच्या मुल्यांकनात रु.५५,६५,०४६/- रुपयांची तफावत असल्याचे निदर्शनास आले.

(२) नाही.

(३) व (४) आर्णि व यवतमाळ तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ११ गावांतील पाणी पुरवठा योजनांच्या कामाच्या मुल्यांकनात रु. ५५,६५,०५६ /- रुपयांची तफावत दिसून आली आहे.

सदर ११ गावांपैकी एका गावातील ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर (FIR) संबधीत पोलीस स्टेशन मध्ये दाखल करण्यात आला आहे. उर्वरित गावातील ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून वसुल पात्र रक्कम वसुलीकरण्यासाठी कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित गट विकास अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्प उद्‌भवत नाही.

-----------------

## लोणी काळभोर जि.नगर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाचा निकाल जाहिर करण्याबाबत

**(७५) * ३१६९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणी काळभोर (जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने तिसरीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परिक्षेचे पेपर तपासण्यासाठी खासगी कंत्राटदारांना देण्यात आले मात्र त्यांनी आठ महिन्यानंतरही निकाल जाहिर केलेला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी आढळून येणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत तसेच प्रज्ञा शोध परिक्षेत निकाल त्वरित लावण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) लोणी काळभोर जि.पुणे येथे सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) होय.

(३) संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली असून त्या ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच संबंधित ठेकेदाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे व प्रज्ञाशोध परिक्षेचा निकाल तयार करण्यात आलेला असून प्रसिद्ध करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी व हिंगोली जिल्ह्यात निर्मल भारत अभियानांतर्गत**
**ग्रामीण भागात शौचालय बांधण्याबाबत**

**(७६) * २७९५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निर्मल भारत अभियानांतर्गत ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेल्या शौचालय बांधकामासाठी अधिकारी व प्रशासकीय यंत्रणा उदासीन असल्यामुळे परभणी व हिंगोली जिल्ह्यात जानेवारी, २०१५ अखेर केवळ १० ते १५ टक्के उद्दिष्ट्येपुर्ती झाली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केवळ कागदोपत्री योजनेची प्रसिध्दी करुन प्रत्यक्षात उद्दिष्ट पुर्तीसाठी उदासिन असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व यंत्रणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या कामी दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकारी, कर्मचारी व यंत्रणाविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
जानेवारी, २०१५ अखेर परभणी जिल्ह्यामध्ये २६ % उद्दिष्टपुर्ती झाली असून हिंगोली जिल्ह्यात २५.३५% इतकी उद्दिष्टपुर्ती साध्य झाली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील अजंठा गुफांची पावसांमुळे झालेली दुरवस्था**

**(७७) * ५४४९ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील अजंठा गुफांची पावसामुळे दुरवस्था झाल्याने त्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना करण्याकरिता योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अशी ग्वाही संबंधित मंत्री महोदयांनी दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही,

अजंठा लेण्या या राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल औरंगाबाद यांच्या अखत्यारीत येतात. अधिक्षक पुरातत्वविद् यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर लेण्यांचे संवर्धन सातत्याने केले जात असून लेण्या सुस्थितीत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत विनाअनुदानित शाळांमध्ये बिंदूनामावली डावलून मान्यता दिलेल्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सेवा संरक्षणाबाबत**

**(७८) * ४५४१ श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत विनाअनुदानित शाळांमध्ये बिंदुनामावली डावलून शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक मान्यता दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १० ते १२ वर्षे विनावेतन काम करणाऱ्या परंतु वैयक्तिक मान्यता असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन सेवा संरक्षण देणार आहे काय,

(३) असल्यास, या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विनाअनुदानित शाळांना शासन अनुदान देणार आहे काय,

(४) नसल्यास, अशी बिंदू नामावली डावलून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देण्यामागे शिक्षणाधिकाऱ्यांचे प्रयोजन काय,

(५) याबाबत शासनाचे पुढील धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत कायम विनाअनुदान तत्वावर असताना मान्यता देण्यात आल्या आहेत.

(२) नाही.

(३) ज्या शाळांनी बिंदूनामावलीनुसार पदभरती केली आहे अशा शाळांना मुल्यांकनानुसार तपासून अनुदान देण्यात येते.

(४) सदर विनाअनुदानित शाळा या शासनाने कायम विनाअनुदान म्हणून मंजूर केल्या होत्या. सदर शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी मागासवर्गीय शिक्षक उपलब्ध नव्हते व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या बिंदू नामावली मध्ये दर्शविलेल्या आरक्षणा व्यतिरिक्त शिक्षकांना मान्यता देण्यात आल्या.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्याची उच्च शिक्षण प्रणाली सुधारण्याबाबत केळकर समितीच्या शिफारशीबाबत**

**(७९) * ४६०० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक समतोल विकास प्रश्नाबाबत राज्यातील उच्च शिक्षण प्रणाली खेदकारक असल्याची टीका केळकर समितीने शासनास दिलेल्या अहवालात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) आदिवासी भागात पहिलीपासून इंग्रजी शिक्षण बंद करावे राज्यातील सर्व अभ्यासक्रमामध्ये आदिवासी संस्कृतीचा समावेश करावा, अशी शिफारशीही करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) उच्च शिक्षणासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यात यावी यासह राज्यातील उच्च शिक्षणासाठी अनेक शिफारशी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अहवालातील उच्च शिक्षणाविषयक केलेल्या शिफारशीबाबत शासनाने कोणकोणते निर्णय घेतले आहेत,

(५) अद्यापी सदरहू शिफारशीनुषंगाने निर्णय घेतले नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) आदिवासी मुलांना मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे व इयत्ता तिसरी किंवा चौथीपासून इतर भाषा शिकविण्यास सुरुवात करावी. तसेच आदिवासी बालकांचा अभ्यासक्रम, पाठयपुस्तके व शिक्षक हे आदिवासी संस्कृतीची अनुकुलरित्या शिक्षण देणारे असावे अशा आशयाच्या शिफारशी केळकर समितीच्या अहवालात करण्यात आल्या आहेत.

(३) होय.

(४) व (५) शिफारशी विचाराधीन आहेत.

-----------------

**कोकणात नवीन भात खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत**

**(८०) * ५४३९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील भातशेती हा प्रमुख व्यवसाय असून वर्षातून एकदाच हे पीक घेतले जाते व वर्षभर ह्या पिकावर शेतकऱ्यांची उपजिविका अवलंबून असते मात्र सन २०१३ पासून शासनाचे भात खरेदी केंद्र बंद असल्याने रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा व अलिबाग येथील शेतकऱ्यांची भातविक्रीबाबत गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समस्येवर पर्याय म्हणून नवीन भात खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून, या योजनेंतर्गत खरीप पणन हंगाम २०१४-१५ साठी धान/भरडधान्य खरेदी करण्यासाठी दिनांक ३०.१०.२०१४ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

गतवर्षी खरेदी केलेला धान अभिकर्ता संस्थांच्या गोदामात तसाच शिल्लक आहे. त्यामुळे नवीन हंगामातील खरेदी केलेला धान साठवणूक करण्यास गोदाम व्यवस्था उपलब्ध नसल्याने चालू खरीप पणन हंगाम २०१४-१५ मधील धान खरेदी सुरु करता आलेली नाही.

(२) गत खरीप पणन हंगामातील भरडाईविना शिल्लक धानाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याची जाहीर ई-निविदा प्रक्रियेद्वारे विक्री करण्याची कार्यवाही चालू आहे.

त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे धान साठवणूकीसाठी अतिरिक्त गोदाम उपलब्ध करुन देण्याची मागणीदेखील अभिकर्ता संस्थांमार्फत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगरपालिकामधील उच्चमाध्यमिक शिक्षकांना १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत

**(८१) * ५४९० श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिकामधील उच्च माध्यमिक शिक्षकांना १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी (काल्पनिक) चा लाभ मिळावा अशी मागणी निवेदनाद्वारे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अमरावती विभाग शिक्षक आघाडीच्या वतीने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे,

शासनाच्या दिनांक २६.०२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शिक्षकांना दिनांक ०१.०१.१९९६ पासून त्रिस्तरीय वेतनश्रेणीचे लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

(२) यासंदर्भात तपासणी करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संस्थाचालकांकडून शिक्षकांचा जाणीवपूर्वक व नियमबाहया पध्दतीने छळ होत असल्याबाबत

**(८२) * ३२५९ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व.बाबूराव बोऱ्हाडे एज्युकेशन संस्था, उल्हासनगर-४ संस्थेच्या विविध शाळांमधील शिक्षकांचा जाणीवपूर्वक छळ होत असल्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, शिक्षण सचिव यांना दि. १९ जानेवारी २०१५ रोजी दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) शिक्षकांच्या नियमबाह्य बदल्या करणे, स्वेच्छानिवृत्ती घेण्यास भाग पाडणे, सेवा समाप्त करणे, सेवा निवृत्ती वेतनासाठी प्रस्ताव न पाठविणे इत्यादी कारणांबद्दल संस्थेविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठांतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. प्रवेशासाठीच्या वेळी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल शुन्य टक्के लागल्याबाबत

**(८३) * २६६० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठांतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. प्रवेशासाठीच्या वेळी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल शुन्य टक्के लागल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार व्हावा यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत असतानाच शुन्य टक्के निकाल लागल्याची बाब गंभीर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) सदरची परीक्षा बहुपर्यायी उत्तरे स्वरुपाची असतानासुध्दा शुन्य टक्के निकाल लागल्याने मराठी भाषेची गळचेपी करण्यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाची याबाबतची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

सदरची परीक्षा फक्त बहूपर्यायी स्वरुपाची नसून बहुपर्यायी, लघुत्तरी व दिर्घोत्तरी अशा स्वरुपाची आहे.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे एक्स-रे फिल्मचा वारंवार होत असलेला तुटवडा

**(८४) * २६८४ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील क्ष-किरण विभागातील एक्स-रे मशिन बंद असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अतिविशेषोपचार रुग्णालय व मेयो इंदिरा गांधी रुग्णालय येथील एक्स-रे फिल्म/सर्जिकल साहित्य/औषधी आदिंचा तुटवडा निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय दर करार संपुष्टात आल्यामुळे अधिष्ठातांना औषधांकरीता व शल्य चिकित्सेकरीता आवश्यक साधनांकरिता संचालकांची परवानगी घ्यावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हृदयरोग चिकित्साशास्त्र करीता वापरण्यात येणारे स्टेंट, बलुन, वायर हे अत्यंत कमी दर्जाचे असल्यामुळे नवीन दर करारामध्ये त्याची दर्जोन्नती करण्यात येणार आहे काय,

(५) तसेच, वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांचे अधिकार वाढविण्यासंबंधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(७) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर संस्थेमध्ये औषधी व सर्जिकल बाबींचा तुटवडा नाही, संस्थेमध्ये गत कालावधीत काही काळ एक्स रे फिल्मचा तुटवडा निर्माण झाला होता. तथापि, सध्या एक्स रे फिल्मचा पुरवठा नियमित सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) औषधे व सर्जिकल, प्रयोगशाळांना लागणारी रसायने इ. बाबी खरेदी करण्याबाबत संबंधित अधिष्ठाता यांना वाढीव वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१४/प्र.क्र.१७८/प्रशा २, दि. ६.२.२०१५ निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच यंत्रसामुग्री/उपकरणे इ.खरेदी करण्याबाबत वाढीव वित्तीय अधिकार व नव्याने प्रशासकीय अधिकार प्रदान करण्याबाबत शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.६१६/प्रशा-१, दि.३०.१.२०१५ निर्गमित करण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजभाषा म्हणून ओळखली जाणारी मोडी लिपिची कागदपत्रे भाषांतरकारांअभावी धूळ खात पडून असल्याबाबत**

**(८५) * ४०८३ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजभाषा म्हणून ओळखली जाणारी मोडी लिपीची कागदपत्रे भाषांतरकाराअभावी राज्यातील पुणे, मुंबई, तंजावर, नाशिक, कोल्हापूर, नांदेड तसेच ठाणे, पालघर जिल्ह्यांच्या शासकीय कार्यालयात धूळ खात पडून असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापी, कारवाई वा उपाययोजना केली नसल्यास दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील १२२ स्वस्त धान्य वितरकाकडून दुकानात धान्याची काळ्या बाजारात होत असलेली विक्री**

**(८६) * ५०३१ श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी तालुक्यातील (जि.यवतमाळ) १२२ स्वस्त धान्य वितरकाकडून दुकानात धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर स्वस्त धान्य वितरकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतची कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) (२) व (३) रास्तभाव धान्याचा काळाबाजार होत असल्याच्या प्राप्त तक्रारीनुसार, तहसिलदार आर्णी यांनी केलेल्या आकस्मिक तपासणीमध्ये नोव्हेंबर, २०१४ मध्ये ५० किलो वजनाचे गव्हाचे १५ पोती व तांदळाचे ९ पोती दोन किराणा दुकानामधुन जप्त करण्यात आले.

सदर प्रकरणी तहसिलदार आर्णी यांनी चौकशी केलेली असून, याबाबत श्री.के.बी.यादव, पुरवठा निरिक्षक आर्णी हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी धान्याचा अपहार परवानाधारक रास्त भाव दुकानदारांनी केल्याचे दिसून येत नसल्याने रास्त भाव दुकानदारांवर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महानगरपालिकांनी कचरा व सांडण्यावर प्रक्रिया करण्याबाबत**

**(८७) * ३८२८ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दररोज ६३८२ दक्षलक्ष लिटर सांडपाणी नैसगिक जलप्रवाहात सोडले जात आहे त्यातील ८० टक्क्यांहून अधिक वाटा राज्यातील महानगरपालिका क्षेत्राचा असल्याचा आक्षेप महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित महानगरपालिकांना दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या महानगरपालिकांना नोटीसा दिल्या त्यांची नावे काय आहेत,

(४) असल्यास, कोणकोणत्या महानगरपालिकांनी कचरा व सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्ध केले आहे,

(५) असल्यास, उर्वरित महानगरपालिकांनी योग्य ती कार्यवाही केली नाही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

तथापि, राज्यातील महानगरपालिकांमधून दररोज ६३८२.९ दशलक्ष लिटर निर्मित होणा-या सांडपाण्यापैकी ३७२६.५ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते व उर्वरित प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नाल्याद्वारे नदीमध्ये सोडले जाते.

(२) हे खरे आहे.

सदर नोटीसांच्या अनुषंगाने अद्यापपावेतो १७ महानगरपालिकांनी एकूण भांडवली खर्चा पैकी २५% तरतुद करून या प्रकल्पांवर खर्च करण्याचे ठराव केले आहेत. ३ महानगरपालिकांनी ठराव मंजूर करण्यासाठी मुदत मागितली असून ४ महानगरपालिकांनी अद्याप ठराव केलेला नाही. उर्वरित २ महानगरपालिकांनी म.प्र.नि.मंडळाशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही.

(३) २६ महानगरपालिकाची नावे पुढील प्रमाणे आहेत.

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, भिवंडी, निजामपूर, चंद्रपूर, धुळे, जळगाव, कल्याण, डोंबिवली, कोल्हापूर लातूर, मालेगाव, मिरा भाईंदर, बृहन्मुंबई महानगरपालिका, नागपूर, नाशिक नांदेड, वाघाळा, नवी मुंबई, परभणी, पिंपरी-चिंचवड, पुणे, सांगली-मिरज-कुपवाड, सोलापूर, ठाणे, उल्हासनगर, वसई विरार,

(४) अमरावती, औरंगाबाद धुळे, कल्याण डोंबिवली, कोल्हापूर, मिरा भाईंदर, बृहन्मुंबई महानगरपालिका, नागपूर, नांदेड वाघाळा, नाशिक नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, पुणे, सांगली-मिरज-कुपवाड, सोलापूर, उल्हासनगर या महानगरपालिकांमध्ये अनुक्रमे पुढील तंत्राचा वापर करून सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते.

अ) ॲक्टीव्हेटेड स्लज प्रोसेस (एएसपी)
ब) रोटरी बायलॉजिकल कॉन्टॅक्टर (आरबीसी)
क) सिक्वेन्शिअल बॅच रिॲक्टर (एसबीआर)
ड) एरिएटेड लगून, इ) युएएसबी, फ) ऑक्सीडेशन पॉन्ड,
ग) अनएरोबिक लगून, ह) प्रायमरी क्लॅरीफायर.

(५) ज्या महानगरपालिकांनी याबाबत कार्यवाही केलेली नाही अशा महानगरपालिकांच्या आयुक्त व महापौर यांच्यावर खटला का दाखल करण्यात येऊ नये अशा आशयाच्या नोटीस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन पाठविण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंतवैद्यकीय, आयुर्वेद व औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयामध्ये शिक्षकांची रिक्त असलेली पदे**

**(८८) * ३७७२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंतवैद्यकीय, आयुर्वेद व औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयामध्ये जानेवारी, २०१५ अखेर संस्थानिहाय रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांची संख्या किती आहे,

(२) सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये जानेवारी, २०१५ अखेर (प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक) यांची एकुण ५९७ पदे रिक्त असून शासकीय दंत महाविद्यालयांत एकुण ८१ पदे रिक्त आहेत. शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात एकुण ९२ पदे रिक्त आहेत. औषधनिर्माणशास्त्र हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित असून शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांमध्ये एकुण २६ पदे रिक्त आहेत.

(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे स्वतंत्र निवड मंडळामार्फत नामनिर्देशनाने व आस्थापना मंडळामार्फत पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच शासकीय दंत महाविद्यालयातील व शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने व आस्थापना मंडळामार्फत पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माटुंगा (मुंबई) येथील दयानंद बालक शाळेतील २४ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत**

**(८९) * २८५८ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा (मुंबई) येथील दयानंद बालक विद्यालयातील २४ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत देण्यात येणारी खिचडी खाल्यामुळे विषबाधा झाली असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शाळेस प्रियदर्शनी निराधार महिला मंडळातर्फे खिचडी पुरविण्यात आल्याने शासनाने याबाबतची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई, तसेच विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांवर शासनाने कोणते तातडीचे उपचार केले आहे,
(४) नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दि. १३.१.२०१५ रोजी श्री.दयानंद बालक विद्यालय, माटुंगा या शाळेतील २४ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार खाल्यानंतर उलटी व पोटदुखीचा त्रास झाला होता.
(२) व (३) संबंधीत बचत गटविरुध्द पोलीस स्टेश्नमध्ये तक्रार दाखल केली आहे. तसेच, त्यांचे आहार शिजविण्याचे काम काढून घेण्यात आले आहे. आहाराचे तसेच धान्याचे नमूने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. उलटी व पोटदुखीचा त्रास झालेल्या विद्यार्थ्यांवर तात्काळ उपचार करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापिठाच्या कालिना संकुलातील वसतीगृहाचा स्लॅब कोसळल्याबाबत**

**(९०) * ३५३३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापिठाच्या कालिना संकुलातील विद्यार्थिनीकरिता असलेल्या वसतिगृहांच्या देखभाल व दुरूस्तीअभावी छप्पर कोसळण्याच्या, पाणी गळतीच्या घटना, मोडकळीस आलेले दरवाजे इत्यादी घटना वारंवार घडत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच वसतिगृहांच्या निकृष्ट कामामुळे भिंतींना ओल आल्याने बुरशीचे साम्राज्य, त्यामुळे संसर्गजन्य रोग होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यापिठाने अधिसभा सदस्यांची समिती नेमून मार्च-एप्रिल, २०१४ मध्ये पाहणी करून अहवाल तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अहवालानुसार वसतीगृहातील विद्यार्थ्यांचे प्रश्न तसेच वसतीगृहाची दुरवस्था सुधारण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे
(२) हे अंशत: खरे आहे
(३) होय,
(४) समितीच्या निष्कर्षानुसार वसतीगृहाच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात झालेली आहे,
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**उल्हास नदी, उल्हासनगर (जि.ठाणे) येथील प्रदुषण रोखण्याबाबत**

**(९१) * २९८८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, ॲड.अनिल परब, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर परिसरातील (रासायनिक) कारखान्यातून कोणत्याही प्रक्रियेविना सांडपाणी उल्हास नदीत सोडण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगरात माहे डिसेंबर, २०१४ रोजी झालेल्या वायुबाधा या संपूर्ण प्रकारास पोलीस यंत्रणा सामील असल्याची बाब उजेडात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हास नदी प्रदूषणाची केंद्राकडून दखल घेऊन महाराष्ट्र प्रदूषण मंडळाला चौकशीचे आदेश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने उक्त प्रश्नाबाबत चौकशी केली काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार चौकशीनुसार उल्हास नदीचे प्रदुषण करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच प्रदुषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) डिसेंबर-२०१४ च्या वायु बाधा प्रकरणी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिनांक ३०/११/२०१४ व १६/१२/२०१४ रोजी चौकशीचे आदेश दिले आहेत.

(४) होय.

(५) उल्हास नदी प्रदूषणासंबंधी मा.राष्ट्रीय हरित न्यायालय प.विभाग, पुणे यांच्याकडे प्रकरण क्र.३७/२०१३ द्वारे दाखल करून घेण्यात आलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षामध्ये म.प्र.नि.मंडळ/म.औ.वि. महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था व सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र यांच्यामार्फत समन्वय साधून उपाययोजना करण्यात येत आहे. तसेच म.प्र.नि.मंडळाने सदरहू कार्यक्षेत्रामध्ये दोषी आढळलेल्या उद्योगावर कारखान्याचे उत्पादन बंद करण्याचे आदेश, प्रस्तावित आदेश, कारणे दाखवा नोटीसा, यासह बॅंकहमी जप्त करणे, अशा प्रकारच्या कार्यवाही सातत्याने केल्या जात आहेत. सदरील प्रकरण मा.राष्ट्रीय हरित न्यायालय यांच्याकडे प्रलंबित असून, न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे म.प्र.नि.मंडळामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इरई आणि झरपट (जि.चंद्रपूर) येथील नद्या प्रदूषित झाल्याबाबत**

**(९२) * ३९६६ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात डब्लूसीएलच्या खाणींमधून निघणारी माती (ओव्हरबर्डन) आजूबाजूला टाकली जात असल्याने त्या जागी मोठमोठे ढिगारे तयार झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ढिगाऱ्यांमुळे चंद्रपूरला पाणीपुरवठा करणाऱ्या इरई आणि झरपट या नद्या संकटात सापडल्या असून त्यातून वाहणारे प्रदूषित पाणी आणि या ढिगाऱ्यांमधून उडणारी माती नागरिक आणि प्राण्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील पाणी टंचाईवर मात करण्याबाबत**

**(९३) * २९६० श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील भूजल पातळी माहे सप्टेंबर, २०१४ पर्यंत ०.०६ मीटरने घटली असल्याने भूजल सर्व्हेक्षण ने केलेल्या सर्व्हेक्षणातून ७६ गावांना पाणी टंचाईचे सावट निर्माण झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ च्या वरिष्ठ भूवैज्ञानिक यांच्या संभाव्य पाणी टंचाई अहवालनुसार ७६ गावांना पाणी टंचाईचे सावट निर्माण होण्याची शक्यता असल्याबाबतचे निदर्शनास आले आहे.

(२) चंद्रपूर जिल्ह्यात ग्रामसभेच्या मागणीनुसार पंचायत समितीकडून पाणी टंचाई आराखड्याकरीता प्रस्ताव मागवून त्या अनुषंगाने ऑक्टोबर ते जून या टंचाई कालावधीत टंचाई कृती आराखडे बनविण्यात आले आहेत. ऑक्टोबर ते डिसेंबर २०१४ च्या पहिल्या टप्प्यात एकही प्रस्ताव न आल्याने पहि ल्या टप्प्याचा टंचाई कृती आराखडा निरंक होता. जानेवारी ते मार्च व एप्रिल ते जून या उर्वरित टप्प्यासाठी एकूण ६९१ गावांचा व ९१७ उपाययोजनांचा समावेश असलेला टंचाई कृती आराखडा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी मंजूर केलेला आहे.

(३) विलंब झालेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाला प्रशासकीय इमारत व इतर इमारत बांधकामासाठी आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९४) * २७५१ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सोलापूर विद्यापीठाला १०० कोटी रुपये व गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाला केवळ ७ कोटी ८८ लाख रुपये निधी देऊन विदर्भावर अन्याय केला, हे खरे आहे काय,

(२) गोंडवाना विद्यापीठाला प्रशासकीय इमारत पी.जी.डी.टी. ची इमारत, ग्रंथालय, परीक्षाविभाग आदी इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असून तसा प्रस्ताव विद्यापीठाने शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासन या विद्यापीठाच्या उभारणीसाठी व विकासासाठी लागणारा निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीसाठी दहा एकर जमिन अधिग्रहित करण्यात आलेली आहे. विद्यापीठासाठी उर्वरित ४० एकर जागा संपादित करणे अंतिम टप्प्यात असून, जागा संपादित झाल्यानंतर विविध इमारती व नवीन विभाग सुरु करण्यासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

**मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बाणकोट या ऐतिहासिक किल्ल्यांची झालेली दुरवस्था**

**(९५) * ४४०७ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बाणकोट या ऐतिहासिक किल्ल्याच्या बाहेरील करण्यात आलेले दुरुस्तीचे काम अतिशय निष्कृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे किल्ल्याची पडझड सुरुच असल्याचे तसेच येणाऱ्या पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे पर्यटकांची संख्या घटत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किल्ल्यांच्या दुरुस्तीचे काम चांगल्या दर्जाचे करण्याबाबत तसेच पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्याबाबत व किल्ल्यांच्या दुरुस्तीचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बी.पी.एड कॉलेजमध्ये काम करणाऱ्या प्राध्यापकांना पगाराची थकबाकी देणेबाबत**

**(९६) * ३१७० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे विभागातील मान्यताप्राप्त बी.पी.एड कॉलेजमध्ये काम करणाऱ्या प्राध्यापकांना बजेटमध्ये पगारासाठी तरतूद करण्यात येवूनही चार महिन्यांपासून पगार मिळाला नसल्याने त्यांनी राज्य उच्च व तंत्रशिक्षण संचालक व शिक्षण सहसंचालक यांचेकडे पाठपुरावा करूनही त्यांना अद्यापी पगार मिळाला नसल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्राध्यापकांना त्वरीत पगार मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापी, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे. तथापी दि.०९/०१/२०१५ रोजी निधी वितरण प्रणालीवर तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी शहरातील नागरी दलीत वस्तीतील कामांबाबत**

**(९७) * २७९९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलितवस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजनेंतर्गत परभणी शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटूंबियांना नळजोडणी व वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी सात कोटी रूपयांचा निधी महानगरपालिकेतील अकार्यक्षम अधिका-यांमुळे सन २०१४-१५ मध्ये वा त्या दरम्यान अखर्चीत राहिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी विलंबास कारणीभूत असणा-यांना पाठीशी घालण्याचे धोरण वरिष्ठ स्तरावरून राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन विहित मुदतीत मंजुर निधीचा खर्च व नागरिकांना सुविधा पुरविण्यास असमर्थ राहिलेल्या संबंधित अकार्यक्षम अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) सदर प्रस्तावास सप्टेंबर, २०१४ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व रुपये ३.१४ कोटी इतका निधी परभणी महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत पाईपलाईन दोन राखीव प्रभागांकरीता मंजूर करण्यात आलेली आहे. त्याऐवजी सहा राखीव प्रभागात मंजूर करणे तसेच, वैयक्तिक शौचालयाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या प्रत्येकी रुपये १२,०००/- अनुदानापेक्षा जास्तीचा येणारा खर्च कशाप्रकारे करण्यात यावा याबाबत सर्वसाधारण सभेत निर्णय घेतल्यानंतर परभणी महानगरपालिकेकडून सदर कामे सुरु करण्यात येणार आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जिल्हा परिषद सोलापूर येथील माध्यमिक शाळांचे २०१२ पूर्वीच्या नियुक्त शिक्षकांचे सुमारे ६०० वैयक्तिक मान्यतेचे प्रलंबित प्रस्तावाबाबत**

**(९८) * ४५४३ श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद सोलापूर येथील माध्यमिक शाळांचे २०१२ पूर्वीच्या नियुक्त शिक्षकांचे सुमारे ६०० वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे दाखल झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाने शिक्षण विभागाला कालबध्द कार्यक्रम दिला होता काय व किती,

(३) वरील प्रस्तावांना मान्यता देताना जिल्ह्याचे सक्षम अधिकारी निलंबीत झाले होते, हे खरे आहे काय,

(४) वरील नियुक्त शिक्षकांचे वैयक्तिक मान्यतेचे सर्वच प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, वरील प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयाने वैयक्तिक मान्यता देण्यासाठी दिनांक २५.९.२०१३ ते १९.१०.२०१३ या कालावधीमध्ये शिबीर आयोजित केले होते.

(३) होय.

(४) व (५) ६०० पैकी २०६ कर्मचा-यांना मान्यता देण्यात आल्या असून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाल्यानंतर उर्वरीत प्रस्तावांना शासन नियमानुसार तपासून मान्यता देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यातील नगरपालिका व जिल्हा परिषद च्या विभाजीत शाळांना माध्यनिहाय मुख्याध्यापकाची पदे मंजूर करण्याबाबत**

**(९९) * ५४९१ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिका व जिल्हा परिषद च्या विभाजीत शाळांना माध्यमनिहाय मुख्याध्यापकाची पदे मंजूर करण्याविषयी शासनास वारंवार मागणी होत असून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.प्रधान सचिव शालेय शिक्षण यांना अमरावती विभाग शिक्षक आघाडीने निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुख्याध्यापकांची पदे मंजूर करून त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील नगरपालिका, जिल्हा परिषदांमधील शाळांमध्ये इ.१ली ते ५ वी साठी १५० विद्यार्थ्यांसाठी १ मुख्याध्यापक व इ. ६ वी ते ८ वी साठी १५० विद्यार्थ्यांसाठी १ मुख्याध्यापक अशी पदे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार मान्य करण्यात आली आहेत. या निकषांनुसार एखाद्या शाळेत दोन माध्यमांचे समांतर वर्ग चालू असतील तर शाळा एकच असल्यास २ मुख्याध्यापक देता येत नाही तसेच माध्यमनिहाय विभाजन करणेबाबत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मध्ये तरतूद नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.